दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य — संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | शनिवार दि.५ जुलै २०२५ | वर्षे४थे | अंक२९९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# सूर्यवंशी मृत्यू प्रकरणी पोलिसांवर गुन्हे

## औरंगाबाद खंडपीठाचे आदेश :आठ दिवसांत गुन्हे नोंदवा

पुण्यभूमी प्रतिनिधी

परभणी: शहरात सहा महिन्यांपूर्वी संविधानाच्या प्रतिकृतीच्या विटंबनेनंतर मोठा हिंसाचार उसळला होता. या हिंसाचारात पोलिसांच्या लाठीमारात आणि नंतर कोठडीत पोलिसांनी केलेल्या मारहाणीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला होता. सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणातील दोषी पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शुक्रवारी दिले आहेत.१० डिसेंबर २०२४ रोजी परभणी शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आली होती. यानंतर ११ डिसेंबर रोजी परभणी बंदचे आवाहन करण्यात आले होते. संविधान प्रतिकृती विटंबना प्रकरणानंतर शहरातील वातावरण तणावाचे झाले होते.१५ डिसेंबर रोजी पोलिसांनी केलेल्या लाठीमारात गंभीर जखमी झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिस कोठडीत मृत्यू झाला होता.



सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूनंतर १८ डिसेंबर २०२४ रोजी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई व्यंकट सूर्यवंशी यांनी शहरातील नवा मोंढा पोलिस ठाण्यात माझ्या मुलाचा मृत्यू हा पोलिस मारहाणीतच झाल्याची फिर्याद दिली होती.या प्रकरणी विजयाबाई सूर्यवंशी यांनी ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करत सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली होती. ॲड. प्रकाश आंबेडकरांनी या प्रकरणी औरंगाबाद खंडपीठात जोरदार युक्तिवाद करत सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू पोलिस मारहाणीतच झाल्याचे सांगितले होते. ॲड. प्रकाश आंबेडकरांना ॲड. एम. बी. संदनशिव यांनी सहकार्य केले. प्रकरणाची सुनावणी न्यायाधीश विभा कंकनवडी, विजय देशमुख यांच्या पॅनलसमोर होऊन न्यायाधीश कंकनवडी यांनी या प्रकरणी दोषी पोलिस अधिकाऱ्यांविरुध्द विजयाबाई व्यंकटराव सूर्यवंशी यांनी १८ डिसेंबर २०२४ रोजी दिलेल्या तक्रारीच्या आधारे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

> सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात राज्य शासनाने स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड, पोलिस निरीक्षक शरद मरे, सहायक निरीक्षक कार्तिकेश्वर तुरनर, चालक मोहित खान यांचे यापूर्वीच निलंबन करण्यात आले आहे. तर सुलोचना गाडेकर, दैठणकर या पोलिस कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.दोषी पोलिस अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणानंतर ॲड. प्रकाश आंबेडकर आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी या प्रकरणात स्वतः उभे राहून युक्तिवाद केला. आज न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे आपल्याला आनंद झाला असून, सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणातील पोलिस अधिकाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी. सदरील खटला फास्ट्रॅक न्यायालयात चालविण्यात यावा, अशी मागणी सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी केली.

> सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या घटनेनंतर दोषी पोलिसांविरुद्ध कारवाई करावी या मागणीसाठी राज्यभरात जनआक्रोश मोर्चे काढण्यात आले होते. त्यामुळे या दोन्ही घटनेच्या निषेधार्थ विविध समाजांच्या वतीने एकत्रित काढण्यात आलेल्या या जनआक्रोश मोर्चामध्ये हजारोंच्या संख्येने समाजबांधव एकवटले होते.

# लाखोंचा महसूल झाला जमा

## धोरण:तहसीलदार संदिप खोमणेंची कामगिरी

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:तालुक्यातील गौण खनिजाच्या विविध गुन्ह्यामध्ये पकडलेल्या वाहनांचा लिलाव तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने पूर्ण करण्यात आला होता. या लिलाव प्रक्रियेतून अनेक वर्षापासून तहसील कार्यालयात सडत असलेल्या भंगार वाहनांचा १८ लाखा ८४ हजारांचा महसूल आतापर्यंत जमा करण्यात आला आहे. लिलाव प्रक्रियेतील आणखी काही वाहनांचे चलन भरणे बाकी असून काही दिवसात उर्वरित वाहनांचेही चलन भरले जाणार आहे. याचा फायदा महसूल विभागाला होणार आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने तहसीलदार संदीप खोमणे यांच्या उपस्थित करण्यात आलेला या वाहनांच्या लिलावामुळे महसूल विभागाच्या खात्यात हा पैसा जमा झाला आहे. अनेक वर्षापासून खितपत पडलेल्या भंगार वाहनांचा शासनासाठी महसूल उभा केला आहे. यामुळे एकतर शासनाला महसूल मिळाला व तहसील कार्यालयात वाहनांनी व्यापलेली जागा मोकळा श्वास घेणार आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, गेवराई तालुक्याला गोदावरी व सिंदफणा या दोन्ही नद्यांचे मोठे पात्र लाभलेले आहे. या नद्यांमधून वाळू चोरीच्या अनेक घटना होत होत्या, अनेक वर्षापासून वाळू मुरूम इत्यादी गौण खनिजाची चोरी होत होती. गौण खनिज खात्याद्वारे येणाऱ्या गौण खनिजाची चोरी होत राहते व यावर महसूल विभागातून कारवाई करण्यात येते. अनेक वर्षापासून गौण खनिजाच्या कारवाईत पकडलेले वाहने तहसील कार्यालयात जमा आहे. या वाहनावरती पान दोन...

# घन ओथंबून येती,आणि हवेतच विरती

## हुलकावणी:तहानलेल्या बळीराजाला पावसाची प्रतीक्षा

**प्रा.शुभम जैन/कडा**

मागील पंधरा दिवसापासून पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत अजूनच भर पडली आहे. पाऊस गायब झाल्यामुळे मूग, उडीद, तूर, बाजरी, सोयाबीन यासारखी खरीप पिके धोक्यात येण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करीत आहेत.यंदा मे महिन्यातच, म्हणजेच एक महिन्यापूर्वीच मान्सूनपूर्व पावसाने सर्वत्र दमदार हजेरी लावली. ओढ्या, नाल्यासह लहान-मोठे प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध झाला. त्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांनी जून महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात मुग, उडीद, तुर, बाजरी, व सोयाबीन आदी खरीप पिकांची पुढील पावसाच्या आशेवर पेरणी केली. मात्र आता पावसाने चांगलीच ताण दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली. सद्यस्थितीला या खरीप पिकांची उगवण देखील बऱ्यापैकी झालेली आहे. परंतु मागील पंधरा दिवसापासून पाऊस गायब झाल्याने उगवलेल्या पिकांची तेजी ओसरल्याने शेतकऱ्याला पावसाची आस लागली. कारण पावसाच्या पाण्यावरच खरीप पिके चांगली येतात. असे शेतकऱ्यांचे अनुभव सांगतात.

> **पावसाअभावी चिंता वाढली...**
>
> मान्सूनपूर्व पावसाने यंदा एक महिन्यापूर्वी हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांनी खरिपासाठी महागडी बी-बियाणे, खते खरेदी करून पेरणी केली. मात्र खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच पावसाने पाठ दाखवली. त्यामुळे पाण्यावाचून पिके जळण्याची शक्यता निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली

# माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख यांच्याकडून अंधश्रद्धेचा उच्छाद!

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:संपूर्ण महाराष्ट्राला आषाढी एकादशीचे वेध असताना तसेच परळी हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक तीर्थक्षेत्र आहे. अशा परळी शहरात माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दीपक देशमुख यांनी परळी शहरात खुलेआम अंधश्रद्धेचा उच्छाद मांडला. सप्तशृंगी देवीच्या मिरवणूकीत रस्त्यात सार्वजनिक ठिकाणी कोंबड्याचा बळी दिला. तसेच अंधश्रद्धा पसरविण्यासाठी



हळदीकुंकू,नारळ ,लिंबू रस्त्यावर टाकून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान या घटनेचा अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीने जाहीर निषेध केला असून लवकरच याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात येणार आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,परळीचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे नेते पान दोन...

# बीडमध्ये आषाढी एकादश

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बीड शाखा, बालरंगभूमी परिषद आणि सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसा-गर (काकू) महाविद्यालयातील संगीत विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकाद-शीनिमित्त ङ्गअभंगवाणीफ हा भक्तिसंगीत गायन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीप-ताई क्षीरसागर यांनी दिली. हा कार्यक्रम आज (दि.५) सकाळी ११ वाजता सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होणार आहे. यात बीड शहर आणि परिसरातील बालकलावंत गायक तसेच नामवंत गायक अभंग गायन सादर करणार असून जवळपास ३० कलावंत या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचा लाभ बीडकर रसिक श्रोत्यांनी घ्यावा, असे आवाहन नाट्य परिषद अध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, स्नेहल पाठक, डॉ. शिवानंद क्षीरसागर, डॉ. संजय पाटील देवळाणकर, भरत लोळगे, पान दोन...



# आजाराचा विळखा

दरवर्षी जून ते सप्टेंबर महिन्यात पाऊस पडतोच, फरक इतकाच आहे की कोणत्या वर्षी तो कमी पडतो, तर कोणत्या वर्षी तो जास्त पडतो. पण पावसाळा कालावधीत एकच साम्य आहे आणि ते म्हणजे पाऊस पडायला लागल्यावर काही दिवसांतच राज्याच्या शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांमध्ये साथीच्या आजारांचा उद्रेक होत असतो. या कालावधीत खासगी दवाखाने, रुग्णालये, शासकीय नागरी आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांची वाढती गर्दी पाहून आजारांचा उद्रेक किती वाढला आहे, याची प्रचिती येते. ताप, हिवताप, मलेरिया, डेंग्यू, चिकगुणिया, स्वाईन फ्लू या साथीच्या आजारांच्या रुग्णांचा वाढता आलेख याच कालावधीत असतो. खासगी दवाखाने, रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची यादी व संख्या शासकीय यंत्रणेकडे पुरेशी जात नसल्याने खरी आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यात सध्या खोकला, कफ, घसादु:खी यांसह कोरोनाचे रुग्ण सापडू लागल्याने देशाच्या आर्थिक राजधानीला आजारांचा विळखा बसल्याचे पाहावयास मिळत आहे. सर्दीपासून सुरू झालेला आजार तापापासून मलेरिया-कोरोनापर्यंत पोहोचण्यास फारसा वेळ लागत नसल्याने मुंबईत साथीच्या आजारांच्या वाढत्या आलेखाचे गांभीर्य वेळीच ओळखणे आवश्यक आहे. पावसाळ्यात साथीच्या आजारांचा दरवर्षी उद्रेक होतो, हे गृहीत धरून मुंबईसह सभोवतालच्या महापालिका, नगरपालिका, ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करत असतात. शहरी भागात मलेरिया व डेंग्यूचा आजार हा डासांमुळेच होत असल्याने डास नियंत्रणासाठी धुरीकरणावर विशेष भर देण्यात येतो. पूर्वीच्या काळी साथीच्या आजारांचा उद्रेक हा प्राधान्याने शहरी भागातच होतो.

ग्रामीण भागामध्ये त्याचे प्रमाण नगण्य असायचे. पण अलीकडच्या काळात साथीच्या आजारांनी ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणावर शिरकाव केल्याने शहरी व ग्रामीण असा कोणताही भेदभाव आता शिल्लक राहिला नाही. डासांपाठोपाठ पावसाळ्यात तलावातून शहरी व ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांतून दूषित पाणी येत असल्यानेही साथीच्या आजाराला पोषक वातावरण उपलब्ध होते. तलावक्षेत्रात पडणाऱ्या पावसामुळे चिखल व गाळाचे पाणीही जलवाहिन्यांतून आपल्या घरामध्ये येते. यामुळे कधी पिवळसर, कधी तांबूस, कधी लालसर रंगाचे पाणी दिसून येते. त्यातच कोठे जलवाहिन्या फुटल्यास तेथील माती, चिखलाचाही समावेश त्यात होत असतो. दूषित पाण्याची समस्या अलीकडच्या काळात वाढीस लागल्याने साथीच्या आजारांचा उद्रेक होऊ लागला आहे. राज्याला साथीच्या आजाराचा विळखा पडत असून, गेल्या साडेपाच महिन्यांत मलेरियाचे ४४७१ रुग्ण तर डेंग्यूचे रुग्ण २०३१ आढळले आहेत. तर चिकनगुनियाचे ९०० रुग्ण आढळले. शहरी भागातील मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनियाचे सर्वाधिक रुग्ण मुंबई महापालिका क्षेत्रात आहेत. मुंबईसोबत ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल-उरण, भाईंदर परिसरातही साथीच्या आजारांचा उद्रेक सध्या झाला आहे. ज्या ठिकाणी खाडी किनारा आहे, तेथे डासांच्या उद्रेकास पोषक वातावरण मिळाल्याने साथीच्या आजारांना पोषक वातावरण तयार होत असते. गलिच्छपणा, साचलेले पाणी, तुंबलेली गटारे-नाले या ठिकाणीही डासांचा फैलाव झालेला असतो. साथीच्या आजारांमध्ये अन्य आजारांच्या तुलनेत मलेरियाचे प्रमाण अधिक असते. यंदा राज्यात मान्सून महिनाभर आधी दाखल झाल्याने साथीच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली दिसून येत आहे. राज्यातील जिल्ह्यामध्ये गडचिरोलीमध्ये ११८०, रायगडमध्ये २११, गोंदियात २८ रुग्ण आढळले आहेत. महापालिकांचा विचार करता मुंबई २३१४, पनवेलमध्ये २१६, ठाण्यात १२८ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूचे पालघरमध्ये १३३, पुणे १२८, अकोला ११९, सिंधुदुर्ग ६६ रुग्ण आढळले. महापालिकांमध्ये मुंबईनंतर नाशिक ३९५, अकोला १३९, नाशिक १३२, ठाणे ६३ रुग्ण आढळले. राज्यामध्ये मलेरियाचे रुग्ण सामान्यत: पावसाळ्याच्या म्हणजेच जुलै ते ऑक्टोबर तसेच डेंग्यूचे रुग्ण सामान्यत: ऑगस्ट ते नोव्हेंबर या महिन्यांत वाढतात. मुख्य कारण म्हणजे तापमान, आर्द्रता आणि अधूनमधून पडणारा पाऊस यांसारख्या हवामानाच्या परिस्थितीमुळे डासांची पैदास होत असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले होते, मात्र यंदा जानेवारीपासून रुग्ण आढळत आहेत. राज्यात चिकनगुनियाच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याने महाराष्ट्राच्या आरोग्य विभागावर कमालीचा ताण पडला आहे. राज्यात ९०० चिकनगुनियाचे रुग्ण आढळले. पण गेल्या वर्षीच्या तुलनेत रुग्णसंख्या वाढल्याचे दिसून येत आहे. पुणे १०४, अकोला ८५, पालघर ६९, सिंधुदुर्ग ४४, महापालिकानिहाय मुंबई ११९, अकोला १०१, सांगली मिरज २४ रुग्ण आढळून आले आहेत. राज्यात लेप्टोचे एकूण १२१ रुग्ण आढळले आहेत, तर स्क्रब टायफसचे १८ आणि जपानी तापाचे ३ रुग्ण आढळले आहेत. स्वाइन फ्लूचे एकूण २०४ रुग्ण आढळले आहेत. त्यापैकी दोघांचा मृत्यू झाला आहे. मुंबईत सर्वाधिक ४२ रुग्ण आढळले आहेत. त्यानंतर सोलापूरमध्ये ३६, पुण्यात ३१, नागपूरमध्ये २७, ठाण्यात २१, छत्रपती संभाजीनगरमध्ये १९, कोल्हापूरमध्ये १७ रुग्ण आढळले आहेत. राज्यात गेल्या १३५ दिवसांत १००४ रुग्ण आढळले आहेत, ज्यात कॉलराचे २२, गॅस्ट्रोचे ३२, अतिसाराचे ४१४, सांध्याचे ५१३ आणि टायफॉइडचे २२ रुग्ण समाविष्ट आहेत. राज्यात आतापर्यंत बर्ड फ्लूचे ७३ रुग्ण आढळले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत मुंबईमध्ये साथीच्या आजारांची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी जून महिन्यात आढळलेल्या रुग्णसंख्येच्या तुलनेत यंदा जूनच्या पंधरा दिवसांतील रुग्ण अधिक असल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच राज्याला डेंग्यूच्या आजाराने विळखा घातला आहे. शहरासह ग्रामीण भागात डेंग्यूचे रुग्ण आढळत असल्याने राज्याच्या आरोग्य विभागाची झोपच उडाली आहे.





# विठ्ठलाने अपार श्रद्धा असलेल्या लाडक्या देवाभाऊला आषाढी एकादश महापूजेला सपत्नीक पुन्हा बोलावलेच!

महाराष्ट्र राज्यातील अनेक वर्षांपासूनच्या परंपरेनुसार,आषाढी एकादशीच्या महापूजेचा सपत्नीक माण हा राज्याच्या मुख्यमंत्र्यांना मिळतो आणि मग, आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर मी मागील वर्षी देवाभाऊ सोबतच्या त्या गोड आठवणीत रमलो त्या भेटीवेळी मी नकळत बोललो होतो भाऊ पुढील वर्षी आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलाच्या महापूजेचा शासकीय माण हा तुम्हालाच मिळणार कारण आम्हा सर्वांना खात्री होती पंढरीचा विठुराया भाऊंनाच जुलै २०२५ रोजी पंढरपूर ला महापुजेसाठी बोलावणारच..! राज्याचे मुख्यमंत्री तथा माझ्या सारख्या लाखो कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान मा.देवेंद्रभाऊ फडणवीस यांच्यासोबत अनेकदा भेटीचा योग आला आहे मा.भाऊंची सदिच्छा भेट म्हणजे सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करतानां एक अमर्याद उर्जा मिळवण्याचं माध्यम असत कधी गुलाबाचं फूल,कधी गुच्छ (बुके) घेऊन भाऊंची भेट घेण्याचा योग आला पण मागील वर्षी भेटीवेळी,मनात काही वेगळंच घडत होत मा.भाऊंची भेट घेतांना मी विचार करत होतो यावेळी भेटीसाठी काय घ्यावं? गुलाबाचं फूल? बुके? की फोटो फ्रेम?तेवढ्यात आठवल पुढील वर्षी तर आषाढी एकादशी आहे! आणि विठ्ठल-रुक्मिणीच्या महापूजेचा मान यंदा सपत्नीक देवाभाऊंनाच मिळणार हे मनोमन ठरवलं होतं!म्हणूनच मी विठ्ठल-रुक्मिणी मातेची एक सुंदर मूर्ती घेऊन भाऊंची सदिच्छा भेट घेतली त्या वेळी मी भावनेनं बोलून गेलो भाऊ पुढील वर्षी आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलाच्या महापूजेचा माण तुम्हालाच मिळणार ! आणि झालंही तसंच! २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेनं विशेषतः लाडक्या बहिणींनी आणि सामान्य मतदारराजान आपल्या हक्काच्या मुख्यमंत्र्याला, देवाभाऊंना, भरभरून मतदानरुपी आशीर्वाद दिला आणि पुन्हा मुख्यमंत्रीपदी विराजमान केलं.साक्षात विठ्ठल-रुक्मिणी मातेचा आशीर्वाद पाठीशी असलेल्या मा.देवेंद्रभाऊ यांना भीती कसली?त्या वेळचे तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री मा.देवेंद्रभाऊ लातूर-निलंगा दौऱ्यावर होते पूर्वनियोजित कार्यक्रम आटपून,त्यांचं हेलिकॉप्टर आकाशाकडे झेपावत होत पंख्याच्या जोरदार वाऱ्याने जमिनीवरील मातीचा धूर उडालाआणि काही वेळातच, प्रसारमाध्यमांतून एक धक्कादायक बातमी समोर आली मुख्यमंत्री मा.देवेंद्रभाऊ ज्या हेलिकॉप्टरमध्ये होते, ते हेलिकॉप्टर हवेत झेपावतानाच अचानक गटांगळ्या खात खाली कोसळलं!
ते थेट जमिनीवर क्रॅश झालं.
हेलिकॉप्टरचं मोठं नुकसान झालं त्याचा स्पर्श लाइटच्या डिपीला झाला. पणमा. देवेंद्रभाऊंना साध खरचटले सुध्दा झालं नाही! कारण त्यावेळी त्यांच्या जवळ होती एका किर्तनकाराने कार्यक्रमात दिलेली विठ्ठल-रुक्मिणी मातेची मूर्ती! आजही ती मूर्ती त्यांच्या घरातील देव्हाऱ्यात श्रद्धेने विराजमान आहे प्रत्येक आषाढी एकादशीला देवाभाऊ संपूर्ण कुटुंबासह त्या विठ्ठल-रखुमाईची मनोभावे पूजा करतात..सांगायच तात्पर्य हेच आहे देवाभाऊच्या पाठिशी साक्षात नेहमी देव उभा आहे सर्वांना कल्पना आहे २०१९ मध्ये स्पष्ट कौल जनादेश मिळवूनही मुख्यमंत्रीपद गेल तरीही हा माणूस खचला नाही विरोधीपक्ष नेते पदाची जबाबदारी स्वीकारून तत्कालीन महाविकास आघाडीला राज्यात जनहितार्थ निर्णय घ्यावे म्हणून अक्षरक्ष कोरोनाच्या भयंकर स्टेज मध्ये राज्यभर दौरे करून तसेच प्रत्यक्ष सभागृहात तत्कालीन महाविकास आघाडी सरकारला धारेवर धरून सळोकी पळो करून सोड करून सोडले होते... कालांतराने काही राजकीय तडजोडीमुळे मुख्यमंत्री पदाऐवजी उपमुख्यमंत्री पद हसत मनाने स्वीकारले भाजपचा निष्ठावंत कार्यकर्ता व पक्ष आदेश म्हणून मि पुन्हा येईल या वाक्याची अनेकांनी टेहाळणी केली परंतु तो पांडुरंगाच्या आशिर्वादाने पुन्हा आला

-संतोष जाधव
भाजप सोशल मीडिया प्रदेश कार्यकारिणी सदस्य

# भाविकांच्या हस्ते वृक्षरोपण

पुण्यभूमीप्रतिनिधी
बीड:श्री क्षेत्र रामगड येथे १० एकर मध्ये फुलणाऱ्या सह्याद्री देवराई प्रकल्पाची सुरूवात ६ जुलै रोजी रामगडाच्या भाविक-भक्त आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या हस्ते होणार आहे. भाविक-भक्तांनी रामगडावर सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे असे आवाहन सह्याद्री देवराई चे जिल्हा समन्वयक शिवराम घोडके यांनी केले आहे. रामगडाचे मठाधिपती योगीराज महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वृक्षारोपण होणार असून यावेळी डॉ. प्रदीप शेळके, सुहास वायगणकर, सागर साठे, माजी सरपंच कोंडीराम निकम, शरद निकम यांची उपस्थिती राहणार आहे.
शहरापासून पाच किलो मीटर अंतरावर असलेल्या पालवनच्या डोंगरावर २०१६- १७ मध्ये सिने अभिनेते सयाजी शिंदे, अरविंद जगताप, शिवराम घोडके यांनी वन विभागाच्या २५० एकरमध्ये १ लाख ६४ हजार विविध जातीचे वृक्ष लावून ३ एकर मध्ये ३ घन वन तयार केलेले आहे. त्याच धर्तिवर बीड पासून ७ किलो मीटर अंतरावर असलेल्या रामगडावर १० एकर मध्ये देवराई २ होणार आहे. येथे विविध सुगंधी, पक्षी बसणारे, औषधी, फळ, सावली देणारे १० हजार वृक्ष लावण्यात येणार आहेत. तर ४० गुंठ्यामध्ये २ घन वन प्रकल्प होणार आहेत. येथे ५ हजार झाडे लावण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने खड्डे खोदण्यात आले आहेत.

## पान सहा वरुन

### मिाजी नगराध्यक्ष दिपक देशमुख

दपक देशमुख हे सप्तशृंगी दुर्गोत्सव मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या वतीने त्यांनी शुक्रवार दिनांक ४ जुलै रोजी परळी शहरात सप्तशृंगी देवी मूर्तीचे प्राण प्रतिष्ठा स्थापना आयोजित करण्यात आली होती. या निमित्ताने परळी शहरातून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये गोंधळी, तृतीय पंथी,संबळवादक आराधी, घोडे यांच्यासह रथातून सप्तशृंगी मुर्तीची मिरवणूक काढण्यात आली होती.
मिरवणूक गणेश पार येथील दीपक देशमुख यांच्या निवासस्थानापासून निघाल्यानंतर गणेश पार रोड मार्गे राणी लक्ष्मीबाई टावर येथे पोहोचली. तसेच पुढे मोंढा मार्केट मधून रोडे चौक ,उपजिल्हा रुणालय मार्गे पुन्हा गणेश पारकडे प्रस्थान केले. या मिरवणुकीत राणी लक्ष्मीबाई टॉवर या सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर हळदीकुंकूवाने चौकोन बनवून त्यावर नारळ,नागवेलीची पाने आदी विविध वस्तू टाकण्यात आल्या होत्या. तसेच तोंडाने कोंबड्याची मान मुरगळून कोंबड्याचा बळी घेण्यात आला. व कोंबडे रस्त्यावर फेकून देण्यात आले. यामुळे आहे काळ त्या चौकोनावरून येणारे जाणारे वाहनधारक तसेच नागरिक जाणे टाळत होते. भितीचे वातावरण निर्माण झाले होते.महाराष्ट्र अंधश्रद्धा जादूटोणा विरोधी कायद्यानुसार सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे पशु हत्या करून अंधश्रद्धा पसरवणे हा दखलपात्र गुन्हा आहे. या घटनेचा परळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला असून संयोजक व ज्यांनी हा प्रकार करावयास लावला अशा भोंदू बाबावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे. दरम्यान या घटनेचे व्हिडिओ परळी शहरात व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी टॉवरला येऊन सदरील रस्त्यावर टाकण्यात आलेले कोंबडे संयोजकांना उचलावयास भाग पाडले.दरम्यान अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीच्या वतीने संयोजकावर गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी निवेदन देण्यात आले.निवेदनावर फिर्यादी अध्यक्ष बालाजी ढगे, राज्य कार्यकारिणी सदस्य सुकेशनी नाईकवाडे, विकास वाघमारे,प्रा.दासू वाघमारे, संजीव राय,रानबा गायकवाड, अनिल मस्के,मुक्ताराम गवळी, नवनाथ दाने,प्रा डॉ.दशरथ रोडे,विजय आटकोरे आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### लाखोंचा महसूल झाला

भला मोठा दंड लागला गेल्याने सदर वाहन मालक मालक वाहन घेऊन जात नसल्याने तहसील कार्यालयातील जागा व्यापली गेली आहे यामुळे त्या ठिकाणी रहदारीला अडथळा निर्माण होत होता. अनेक तहसीलदार आले गेले परंतु याबाबत ठोस भूमिका कोणीही घेतली नाही. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेऊन तहसीलदार संदीप खोमणे यांनी दि. २९ मे रोजी तहसील कार्यालया मधील ४१ वाहनांचा आरटीओ यांच्या दिलेल्या किमतीनुसार लिलाव प्रक्रिया पार पाडली. यामध्ये ३९ वाहनांना बोली लावण्यात आली तर दोन वाहनांना कुणीही बोली न लावल्याने त्या दोन वाहनांचा लिलाव होऊ शकला नाही. ३९ वाहने उच्च बोली बोलणाऱ्याला लिलाव प्रक्रियेद्वारे वाहने देण्यात येणार आहे. ३९ वाहनांपैकी ३४ वाहनांचे १८ लाख ८४ हजारांचे चलन भरले गेले असून लवकरच सदर वाहने आरटीओचे आरसी कॅन्सल करून व भंगार म्हणून लिलावधारकाच्या ताब्यात देण्यात येणार आहे. लिलाव प्रक्रियेतील आणखी काही वाहनांचे चलन भरणे बाकी असून काही दिवसात उर्वरित वाहनांचेही चलन भरले जाणार आहे. याचा फायदा महसूल विभागाला होणार आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने तहसीलदार संदीप खोमणे यांच्या उपस्थित करण्यात आलेल्या या वाहनांच्या लिलावामुळे महसूल विभागाच्या खात्यात हा पैसा जमा झाला आहे. अनेक वर्षापासून खितपत पडलेल्या भंगार वाहनांचा शासनासाठी महसूल उभा केला आहे. यामुळे एकतर शासनाला महसूल मिळाला व तहसील कार्यालयात वाहनांनी व्यापलेली जागा मोकळा श्वास घेणार आहे.

### बीडमध्ये आषाढी

अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवणीकर, विलास सोनवणे, राहुल सोनवणे, दुष्यंत रामटेके, दीपक जमधाडे, अमित गाडे, अनिता शिंदे, नामदेव साळुंके, सुरेश साळुंके, सुरेश थोरात, विजय राख तसेच नाट्य परिषद व बालरंगभूमी परिषदेचे सदस्यांनी केले आहे.

## पान सहा वरुन

### गेवराई तालुक्यात

उपस्थित राहून तालुक्यातील कामकाजाचा आढावा घेतला, कर्मचारी प्रवर्गास मार्गदर्शन केले. तहसील कार्यालयातील नूतनीकरण कामाची पहाणी केली. कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य जनतेला अडचणी विचारून घेऊन त्या सोडविण्यासाठी तहसीलदार यांना आदेशीत केले. दिवस भर गेवराई तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली. अनेक नागरीकांनी आपल्या समस्या जिल्हाधिकारी यांच्या समोर मांडल्या या सर्व बाबीचा विचार करून समस्या सोडवण्यासाठी तहसीलदार प्रयत्नशील असून आणखी तत्परतेने काम करतील असे अश्वाषित केले. यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार संदिप खोमणे व विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### बीडमध्ये सीट्रिपलआयटीचा

माध्यमातून उद्योग क्षेत्रात स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणार असून औद्योगिक वातावरण विकसित होईल, असेही म्हटले आहे.

### लोकमान्य हॉस्पिटल्सन

यांच्या धोरणात्मक नेतृत्वाखाली आणि लोकमान्य हॉस्पिटल्सचे अध्यक्ष व मुख्य सांधेरोपण शल्यचिकित्सक डॉ.नरेंद्र वैद्य आणि अवयव प्रत्यारोपण प्रणेते डॉ.के रविंद्रनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य हॉस्पिटल्सने महत्त्वकांक्षी विस्तार योजना आखली आहे.यामध्ये पुढील ३ ते ४ वर्षात ३०० बेडस पासून ८०० बेडसपर्यंतचा विस्तार, त्याचबरोबर हृदयरोग चिकित्साशास्त्र (कार्डियाक सायन्सेस), मज्जातंतू शास्त्र (न्युरोसायन्सेस), व्यापक कर्करोग उपचार, जनरल व जीआय सर्जरी आणि बहु-अवयव प्रत्यारोपण यासाठी पुणे आणि महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये जागतिक दर्जाचे उत्कृष्टता केंद्रे यांचा समावेश आहे. २०२९ पर्यंत महाराष्ट्रातील अग्रगण्य मल्टीस्पेशालिटी व क्वार्टनरी केअर हॉस्पिटल साखळी म्हणून आपले स्थान बळकट करण्याचे लोकमान्य हॉस्पिटल्सचे उद्दिष्ट आहे. प्रगत प्रत्यारोपण सुविधा, व्यापक कर्करोग उपचार सुविधा, रोबोटिक शस्त्रक्रिया आणि न्युरोलॉजिकल व आर्थोपेडिक सेवा, हृदय चिकित्साशास्त्र, जनरल व जीआय सर्जरी, ऑंकोलॉजी, ट्रॉमा व क्रिटिकल केअर यांच्या संयोजनासह संस्थेचा एकात्मिक दृष्टीकोन यामुळे भारतातील प्रमुख केंद्र म्हणून स्थापित होईल. याप्रसंगी लोकमान्य हॉस्पिटल्सचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक मनप्रीत सोहल म्हणाले की, उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपी सोबतची ही भागीदारी लोकमान्य हॉस्पिटल्ससाठी एक परिवर्तनाचा क्षण असून महाराष्ट्रातील प्रमुख मल्टीस्पेशालिटी व क्वार्टनरी केअर हॉस्पिटल चेन म्हणून विकसित होण्यास मदत होईल. या मोठ्या गुंतवणूकीमुळे रोबोटिक शस्त्रक्रियांमधील आमच्या कौशल्याची व्यापक क्वार्टनरी केअर क्षमतांशी सांगड घालता येईल व यामुळे आरोग्य सेवेतील एक प्रमुख राष्ट्रीय केंद्र म्हणून ओळख प्राप्त होईल. बहुअवयव प्रत्यारोपण आणि व्यापक कर्करोग उपचार सेवा यांमुळे भारतभरातील आरोग्यसेवांच्या गरजांची पूर्तता करू शकू,असा आम्हाला विश्वास आहे.लोकमान्य हॉस्पिटल्सचे अध्यक्ष व मुख्य सांधेरोपण शल्यचिकित्सक डॉ.नरेंद्र वैद्य म्हणाले की, आशियामधील रोबोटिक शस्त्रक्रियेमध्ये अग्रगण्य संस्था म्हणून पाया रचल्यानंतर आम्ही आता महाराष्ट्रातील सर्वांत प्रगत मल्टीस्पेशालिटी व क्वार्टनरी केअर हॉस्पिटल साखळी स्थापन करण्याच्या आमच्या महत्त्वाकांक्षी प्रवासाला सुरूवात करत आहोत. व्यापक उपचार सेवांमधील आमच्या विस्तारामुळे भारतातील रूग्णांना जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सेवा उपलब्ध होतील.उनाप्राईम इनवेस्टमेंट डव्हायझरचे संस्थापक दीप मिश्रा म्हणाले की, व्यापक प्रत्यारोपण सेवा स्थापित करण्याची लोकमान्यची वचनबध्दता भारताच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांमध्ये एक लक्षणीय प्रगती दर्शविते. त्यांच्या स्थापित रोबोटिक शस्त्रक्रिया उत्कृष्टतेसह प्रगत प्रत्यारोपण क्षमता याचे संयोजन देशभरातील रूग्णांसाठी एक अद्वितीय आरोग्य सेवा केंद्र स्थापन करेल आणि वैद्यकीय उत्कृष्टता आणि परिणामांमध्ये नवा मापदंड स्थापित होईल.

### भाविकांची कसलीही

नारायणगड येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्य पथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. यासोबतच श्री क्षेत्र नारायणगड येथे ४,५,६,७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## पिंपरी येथे भरधाव पीएमपीएल बसवर कोसळले भले मोठे झाड

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवडमधील काळभोर नगर येथे पुणे-मुंबई जुन्या महामार्गावर पीएमपीएमएल बसवर झाड कोसळले. या बसमध्ये ७० प्रवाशी होते, सुदैवाने या घटनेमध्ये कुणीही जखमी झाले नाही, अशी माहिती अग्निशमन दलाने दिली आहे. ही घटना सकाळी दहाच्या सुमारास घडली. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार, सकाळी दहाच्या सुमारास पुणे- मुंबई जुन्या महामार्गावर काळभोर नगर येथे फुटपाथवरील भलं मोठं झाड भरधाव पीएमपीएल बसवर कोसळलं. सुदैवाने या घटनेमध्ये कोणीही जखमी नाही. या घटनेनंतर तात्काळ अग्निशमन दल घटनास्थळी पोहोचले. बस मधील सर्व प्रवाशांना सुखरूप बाहेर काढले, झाड बाजूला काढण्यात आले असून वाहतूक देखील सुरळीत झाली आहे. फुटपाथच्या शेजारी केबल टाकण्याचे काम सुरू आहे. झाडाच्या बाजूला खोदण्यात आलं होतं. यामुळे झाडांची मूळे सैल झाली होती. याच दरम्यान भरधाव पीएमपीएल बस वर हे झाड कोसळलं. सुदैवाने प्रवाशांचे दैव बलवत्तर असल्याने यात कुणीही जखमी झालं नाही किंवा जीवितहानी झालेली नाही.

## वेचक

### साईबाबा पालखी सोहळ्यात दागिने लंपास

**पुणे :** श्री साईबाबा पालखी सोहळ्यात ज्येष्ठ महिलेची ९१ हजार रुपयांची सोनसाखळी चोरट्यांनी लांबविल्याची घटना फडके हौद परिसरात घडली. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला नारायण पेठेत राहायला आहेत. गुरुपौर्णिमेनिमित्त दरवर्षी श्री साईबाबा पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. पालखी सोहळ्यात दर्शनासाठी आलेल्या ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील ९१ हजारांची सोनसाखळी चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. सोनसाखळी चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक गोरे याबाबत तपास करत आहेत.

### जन्मठेप शिक्षा भोगलेल्या कैद्यांचे पुनर्वसन

**पुणे :** भोई प्रतिष्ठान पुणे,आदर्श मित्र मंडळ पुणे यांच्यावतीने गेली दहा वर्षे कारागृहातून शिक्षा भोगून बाहेर आणलेल्या बंदी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी "प्रेरणापथ"या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून यामध्ये मुख्यतः शिक्षा भोगून बाहेर आलेल्या कैद्यांना रोजगार आणि व्यवसाय उभे करून देणे हा महत्त्वाचा भाग आहे. कारण त्यांना जर रोजगार दिला नाही तर ते पुन्हा व्यसने आणि गुन्हेगारीकडे वळतात. हाच विचार लक्षात घेऊन आतापर्यंत या प्रकल्पाच्या माध्यमातून २५ पेक्षा जास्त कैदी बांधवांनी स्वतःच्या पायावर उभे राहून समाजात ताठ मानेने जगण्याचा संकल्प केला आहे आणि तो पूर्णत्वास गेला आहे. याच शृंखलेत नुकतेच दोन कैदी बांधवांना भेळ आणि पाणीपुरीचा स्टॉल सुरू करून देण्यात आला. गेली दहा वर्षे हा प्रकल्प सुरू असल्याचे सांगून संपूर्ण राज्यातील कैदी बांधव याचा लाभ घेत असल्याची माहिती दिली.

### दौंडमध्ये ज्वारीची आवक घटली

**दौंड :** दौंड तालुक्यात ज्वारीची आवक घटली असून, बाजारभावात प्रतवारीनुसार प्रतिक्विंटल दीडशे रुपयांची वाढ झाली आहे. ज्वारीची एकूण ६३ क्विंटल आवक असून, त्यास प्रतवारीनुसार किमान २३०० तर कमाल ३६५० प्रतिक्विंटल असा बाजारभाव मिळाला. दौंड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दौंड मुख्य बाजारासह पाटस व यवत येथील उपबाजारांमध्ये भुसार मालाची आवक घटली असून, बाजारभाव स्थिर आहे. केडगाव येथील उपबाजारात भुसार मालाची आवक वाढली आहे. बाजारभावात तेजी आहे. दौंड मुख्य बाजारात भाजीपाल्याची आवक वाढली असून बाजारभाव स्थिर आहे. केडगाव येथे कांद्याची ५३०५ क्विंटल आवक होऊन कांद्यास प्रतवारीनुसार किमान ४००तर कमाल २२०० प्रतिक्विंटल असा बाजारभाव मिळाला. दौंड मुख्य बाजारात कोथिंबिरीची २२३४० जुडी आवक होऊन त्यास शेकडा किमान २०० तर कमाल ६०० रुपये जुडी असा बाजारभाव मिळाला. मेथीची ८५६० जुडी आवक होऊन त्यास शेकडा किमान ५०० तर कमाल १९०० रुपये जुडी असा बाजारभाव मिळाला.

# पिंपरी-चिंचवड पालिकेच्या आर्थिक वर्षात १२०० कोटींचा संकल्प

## पहिल्या तिमाहीत ५२२ कोटींची ऐतिहासिक कर वसुली

◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत म्हणजेच ९० दिवसांच्या कालावधीत ५२२ कोटी रुपयांची ऐतिहासिक कर वसुली करून नवा विक्रम केला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते कर वसुली मोहिमेमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या १० कर्मचारी आणि तीन विभागीय कार्यालयांचा प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन कार्याचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी आयुक्त शेखर सिंह यांनी म्हटले की, "महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी दाखविलेली कार्यक्षमता आणि निष्ठा अत्यंत प्रशंसनीय आहे. पहिल्या तिमाहीतच ५२२ कोटी रुपयांची वसुली करणे हे महापालिकेच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. महापालिकेची आर्थिक स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी आणि विकास कामांना गती देण्यासाठी कर संकलन अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्मचाऱ्यांनी दाखविलेल्या या कार्यक्षमतेमुळे आम्ही या आर्थिक वर्षात १२०० कोटी रुपयांच्या कर वसुलीचे लक्ष्य गाठू शकतो," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> “ कर संकलन ही केवळ आर्थिक प्रक्रिया नसून, ती महापालिकेच्या विकासात्मक दृष्टिकोनाची मूर्त अभिव्यक्ती आहे. या मोहिमेत सहभागी प्रत्येक कर्मचाऱ्याने टीमवर्क, नियोजन आणि नागरिकांशी सकारात्मक संवाद याचा उत्तम नमुना सादर केला आहे. ही कामगिरी केवळ प्रशंसनीय नाही तर इतर महापालिकांसाठीही प्रेरणादायी आहे, पुढील काळात करदात्यांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेशन उपक्रमांतर्गत डिजिटल माध्यम, डेटा विश्लेषण अधिक प्रभावी वापर, कर जागरूकता मोहीमा, वसुली प्रक्रियेत पारदर्शकता, तसेच प्रभागस्तरावर कार्यक्षम पथकांची स्थापना या उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. नागरिकांना सुलभ सेवा देण्यासाठी आणि त्यांचा विश्वास संपादन करणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील**, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

आर्थिक वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ च्या या दोन आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कर संकलनात उल्लेखनीय वाढ दिसून आली आहे. मात्र १ एप्रिल २०२५ ते ३० जून २०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत तब्बल ४ लाख १२ हजार मालमत्ताधारकांनी कर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. यात पालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देताना ३ लाख २३ हजार २३९ नागरिकांनी तब्बल ३८० कोटींपेक्षा जास्त कर ऑनलाइन पद्धतीने भरला आहे.



**तीन विभागीय कार्यालयांची उल्लेखनिय कामगिरी**

वाकड – ६५ कोटी ११ लाख
चिखली – ३९ कोटी ३५ लाख
मोशी – ३० कोटी ५३ लाख

मालमत्ता कर संकलन मोहिमेत उल्लेखनीय कामकाज केल्यामुळे आयुक्त शेखर सिंह यांनी फॉक्सबेरी टेक्नोलॉजी टीमचे सन्मान चिन्ह देऊन कौतुक केले. सिटी हब फॉर डेटा कम्युनिकेश उपक्रमांतर्गत कर आकारणी व कर संकलन विभागामध्ये माहिती विश्लेषण, प्रभावी जनजागृती, घरपोच बिल वाटप यासह इतर कामांत फॉक्सबेरी टेक्नोलॉजी टीमने करदात्यांपर्यंत पोहोचण्यात महत्त्वपूर्ण मदत केल्याचे आयुक्तांनी यावेळी नमूद केले.

## पिंपळे सौदागर येथे साकारतेय महाराष्ट्रातील एकमेव ‘वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क’





◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यान येथे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्वांना हेवा वाटावा असे महाराष्ट्रातील एकमेव वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क साकरण्यात येत आहे. माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी नुकतेच या कामाची आज पाहणी केली. लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्यात यावे अशा सूचना देखील त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. जगातील ७ आश्चर्य असणाऱ्या वास्तु व इतर ऐतिहासिक वास्तु या स्मारकाच्या स्वरूपात येथे साकरण्यात येत आहेत. टाकवूपासून टिकावू मटेरियलचा वापर करून हे थीम पार्क साकरण्यात येत आहे. या थीम पार्क मध्ये एकूण १७ ऐतिहासिक वास्तु असणार आहेत. त्यात जगातील ७ आश्चर्य असणारे ताज महल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लीनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अजंता कव्ह, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इतजा, पीरामीड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जोर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबरटी, ट्रेव्ही फाउंटन, माऊंट रश्मोर इत्यादी वस्तु साकारण्यात येणार आहेत.

या संपूर्ण थीम पार्कसाठी एकूण ११.०२ कोटी रुपये इतका खर्च करण्यात येणार आहे. हे थीम पार्क महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार संकल्पनेतून होत आहे. हे वेस्ट टू वंडर वर्ल्ड थीम पार्क महाराष्ट्रातील एकमेव पार्क आसून यामुळे पिंपरी चिंचवड शहरातील वैभवात भर पडणार आहे तसेच हे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळ होणार आहे यात काही शंका नाही. हे थीम पार्क लवकरच पूर्ण होवून नागरिकांसाठी खुले होणार आहे अशी माहिती संबंधित विभागाचे अधिकाऱ्यांनी विरोधी पक्षनेते नाना काटे यांना कामाचा पाहणी करते वेळी दिली.

## पुण्यातून आषाढी वारीसाठी पाचशेहून अधिक बस

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

आषाढी वारीला जाणाऱ्या भाविकांसाठी एसटीच्या पुणे विभागाकडून पाचशेहून अधिक जादा गाड्यांचे नियोजन केले आहे. स्वारगेट आगारातून जादा गाड्या सोडण्यात येणार असून, भाविकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही एसटी प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत मुक्ताबाई यासह अन्य संतांच्या पालख्या आषाढी वारीनिमित्त पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाल्या आहेत. ज्यांना पालखी सोहळ्याबरोबर चालणे शक्य होत नाही. ते पालख्या वाखरीजवळ



पोहोचण्याआधीच पंढरपूरमध्ये गर्दी करतात. त्यामुळे पुणे जिल्ह्यासह राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक एसटीने पंढरपूरमध्ये येतात. दि. ६ जुलै रोजी आषाढी यात्रा असल्यामुळे स्वारगेट आगारातून जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. त्यासाठी एसटीच्या पुणे विभागाकडून ३२५ जादा गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे, तर अमरावती प्रदेशकडून १५० आणि कोकण विभागातून १५ जादा गाड्या आल्या आहेत. नियमित पंढरपूर मार्गावर धावणाऱ्या गाड्यांसह जवळपास पाचशे गाड्यांचे नियोजन केले आहे. नवीन बस, तसेच महिला तिकीट सवलतीमुळे प्रवाशांची गर्दी वाढत आहे. गेल्या तीन-चार वर्षांच्या तुलनेत यंदा एसटीकडून जादा गाड्या सोडल्याचे एसटी प्रशासनाकडून सांगण्यात आले. एकाच गावातील वारकऱ्यांनी समूहाने एसटीचे बुकिंग केल्यास त्यांच्या गावातून गाडी सोडण्याची व्यवस्था एसटी प्रशासनाने केली आहे. त्यालाही काही भाविकांनी प्रतिसाद देत आतापर्यंत दहा गाड्यांचे बुकिंग झाले आहे. कोणी इच्छुक असल्यास भाविकांनी ग्रुप बुकिंग करावे, असे आवाहन एसटी प्रशासनाने केले आहे.

## 'दगडूशेठ' गणपती मंदिरात २१ दिवसांचा अतिरुद्र महायज्ञ

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

संपूर्ण विश्वात शांती व सद्‌भावना निर्मितीकरिता श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने २१ दिवसांचा अतिरुद्र महायाग मंदिरात होणार आहे. यामध्ये तब्बल ६५ ब्रह्मवृंद सहभागी होणार असून दि. ५ ते २५ जुलै दरम्यान दररोज दुपारी १ ते सायंकाळी ७ यावेळेत हा महायाग होणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने यांनी दिली.

अतिरुद्र यज्ञ ही केवळ पूजा नसून, एक आध्यात्मिक ऊर्जा प्रक्षेपण आहे. वेदांनुसार, या यज्ञामुळे



व्यक्ती, कुटुंब व जग यांच्यात संतुलन व शुद्धता येते. हा यज्ञ जेथे होतो तेथे सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. मनुष्यातील चेतनापेशी उर्जित होतात आणि कार्यमग्नता वाढते. एक लघुरुद्र म्हणजे ११ ब्रह्मवृंदांनी ११ वेळा रुद्रपठण करणे, असे ११ लघुरुद्र म्हणजे १ महारुद्र आणि ११ महारुद्र म्हणजे १ अतिरुद्र होय. अतिरुद्राच्या या मोठया व्यापकतेमुळे वायुमंडल शुद्धधी होऊन सर्व जीवजंतू दूर होतात व सर्व आजारांपासून मुक्ती मिळते. अतिरुद्र यज्ञ केवळ एक धार्मिक विधी नसून, एक सामूहिक आध्यात्मिक जागरण आहे. यामुळे संपूर्ण समुदाय, गाव, शहर किंवा राष्ट्र स्तरावर अनेक अद्‌भूत सकारात्मक बदल घडून येतात. दगडूशेठ गणपती मंदिरात मागील चार वर्षांपासून हा यज्ञ करण्यात येत आहे. अतिरुद्र महायागाचे हे ५ वे वर्ष आहे. मंदिराच्या सभामंडपात भव्य होमकुंड साकारुन हे अतिरुद्र होम करण्यात येणार आहे. वेदमूर्ती नटराज शास्त्री यांसह ६५ ब्रह्मवृंद यामध्ये सहभागी होतील. तरी भाविकांनी मंदिरात अतिरुद्र याग व विविध धार्मिक कार्यक्रमांत सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## ‘संविधान भवन’च्या टप्पा दोन कामाला स्थायी समितीची मान्यता

◆ **पिंपरी (प्रतिनिधी) :**

भारतीय राज्यघटना आणि जगभरातील लोकशाही देशांच्या घटनांचा अभ्यास करता यावा, भारतीय संविधानाबाबत प्रचार-प्रसार आणि जागृती करता यावी यासाठी महाराष्ट्रातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारण्याचे काम सुरू झाले आहे. त्याच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला महानगरपालिका स्थायी समिती सभेत मान्यता देण्यात आली.

भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी २०१७ मध्ये ‘‘भोसरी व्हीजन-२०२०’’ २०२० उपक्रम हाती घेतला. यामध्ये संविधान भवन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी उभारण्याचा संकल्प



केला होता. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात संविधान भवनचे काम लांबणीवर पडले. २०२२ मध्ये पुन्हा भाजपा महायुतीची सत्ता आल्यानंतर पहिल्या टप्प्यातील कामाचे भूमिपूजन २०२३ मध्ये करण्यात आले. आता दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे १२० कोटी रुपयांच्या कामाला मंजुरी दिली आहे.

शहरातील पेठ क्र. ११ येथील जागा क्र. २ क्षेत्र २५८९४.२० चौ. मीटर नियोजित प्रकल्पाच्या जागेत भव्य संविधान भवन उभारण्यात येत आहे. त्यामध्ये तळमजल्यावर एझिबिशन हॉल- ४ ऑडिओरिअम ३०० आसन क्षमता असणार आहे. पहिल्या मजल्यावर लायब्ररी हॉल-४, तसेच बेसमेंटमध्ये ३५० चारचाकी वाहने , १ हजार दुचाकी वाहने पार्किंग होतील इतक्या क्षमतेचे वाहनतळ असणार आहेत. त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकात केला आहे. या प्रकल्पासाठी केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाकडून प्रधानमंत्री जनविका कार्यक्रम अंतर्गत ५० कोटी रुपये आणि महाराष्ट्र राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभागाकडून १५ कोटी रुपयांचे अनुदान मिळेल, असे अपेक्षित आहे.

## छत्रपती शाहू महाराज संघर्षाचे प्रतीक : डॉ. श्रीपाल सबनीस



◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

ज्ञान आणि संघर्ष सेवेचा सुगंध म्हणजे छत्रपती शाहू महाराज होय. त्यांनी सद्‌गुणांची पेरणी करत उपेक्षित, कष्टकरी, दुर्लक्षित, वंचित बहुजनांसाठी कार्य केले. ते क्रांतिकारक वृत्तीचे तसेच संवाद आणि संघर्षाचे प्रतिक होते, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. छत्रपती शाहू महाराज यांचा आदर्श ठेवून डॉ. बाबासाहेब कांबळे संतांच्या समतेचा समर्पणातून विचार करत कार्य करत आहेत, अशा शब्दात डॉ. सबनीस यांनी त्यांचा गौरव केला. जयंतीनिमित्त पंचायतीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब कांबळे यांचा गौरव करण्यात आला.

## मासिक धर्माचे महत्व विशद करीत विद्यार्थिनींचा रिंगण सोहळा

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

‘पुंडलिक वरदे हरि विठ्ठल’, ‘सब महिला संतन की जय’ असा नामघोष आणि स्त्री संतांच्या अभंगांचा गजर करून शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी मासिक धर्माचे महत्त्व विशद करीत अनोखा रिंगण सोहळा साजरा केला. निमित्त होते साईनाथ मंडळ ट्रस्ट आणि श्री शिवाजी मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आयोजित उपक्रमाचे. नारायण पेठेतील एसएनडीटी कन्याशाळेत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संत साहित्याच्या अभ्यासिका प्रा. डॉ. रुपाली शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विठ्ठल-रखुमाईची वेशभूषा धारण केलेल्या



विद्यार्थिनींच्या गळ्यात पुष्पमाला घालून रिंगण सोहळ्याची सुरुवात झाली. या अनोख्या रिंगण सोहळ्यात टाळ, झेंडे, अब्दागिरी, संतांची छायाचित्रे घेऊन विद्यार्थिनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाल्या होता. शाळा, महाविद्यालयातील शिक्षिका तसेच गणेश मंडळाच्या सदस्यांचा यात विशेषत्वाने सहभाग होता. प्रास्ताविकात कार्यक्रमाची संकल्पना विशद करताना पियूष शहा म्हणाले, महिला संतांनी भक्तीपरंपरेत आणि मराठी साहित्य क्षेत्रात मोलाची भर घातली आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजाला समता, भक्ती आणि आध्यात्मिक ज्ञानाचा संदेश मिळाला आहे. हा संदेश पुढील पिढीपर्यंत जावा या उद्देशाने या अनोख्या रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. देहाचा विटाळ बाजूला सारून महिलांच्या मासिक धर्माविषयी जागृती करणारा हा पहिलाच रिंगण सोहळा आहे, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. ‘देहासी विटाळ म्हणती सकळ, आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध’, ‘स्त्री जन्म म्हणोनी न होई उदास’ हे संत सोयराबाई आणि संत जनाबाई यांचे अभंग गात रिंगण सोहळा साजरा करण्यात आला.

## डॉ. देवेंद्र रामचंद्र साठे यांना 'आयुष योगाचार्य महासन्मान' पुरस्कार

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

पुणे येथील सुप्रसिद्ध योग एवं प्राकृतिक चिकित्सक डॉ. देवेंद्र रामचंद्र साठे यांना नुकतेच आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, ए जी एम ए, व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) डॉक्टर सेल आयुष विभाग वतीने अतिशय प्रतिष्ठेचा 'आयुष योगाचार्य महा सन्मान' पुरस्कार मोठया थाटात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे देण्यात आला. या पुरस्काराला



महाराष्ट्रातील योगशिक्षक योग थेरपीस्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये शिक्षण सम्राट समजल्या जाणारे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेलचे प्रदेश अध्यक्ष डॉक्टर श्री बाळासाहेब पवार साहेब हे कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते. सोबत पाहुण्यांमध्ये उद्योजक मनोज दांडगे साहेब उपस्थित होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ नितीन राजे पाटील आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन व्हाईस चेअरमन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी डॉक्टर सेल प्रदेश कार्याध्यक्ष (आयुष विभाग) डॉक्टर सतीश कराळे चेअरमन आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, डॉक्टर डॉ बाबुराव कानडे अध्यक्ष आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, दिशा चव्हाण, प्रशांत सावंत, प्राध्यापक कुणाल महाजन, मनोहर कानडे व इतर आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

### ११६ पैकी ७६ धोकादायक इमारतींवर पालिकेची कारवाई

## शहराच्या मध्यवर्ती पेठांमधील ३७ इमारतींचा प्रश्न ऐरणीवर

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

पुण्यातील लष्कर भागात एका धोकादायक इमारतीचा स्लॅब कोसळण्याच्या पार्श्वभूमीवर शहराच्या मध्यवर्ती पेठांमधील ३७ इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या इमारती पाडण्यास नागरिक विरोध करत असून, पावसाळ्यात दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने या इमारतींचे वीज आणि पाणीपुरवठा खंडित करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच हे वाडे व इमारती रिकामे करण्यास मदतीसाठी पोलिसांना पत्र देखील दिले आहे.



पुण्यात २८०० जुने वाडे आहेत. यातील अनेक वाडे व इमारतींचा पुनर्विकास करण्यात आला आहे. मात्र, काही वाडे मालक- भाडेकरू वाद, बांधकाम नियमावलीमुळे येणारे अडथळे, आर्थिक अडचणी यामुळे अद्यापही तसेच असून येथे अनेक कुटुंब राहतात. लाकूड आणि मातीचा वापर करून पूर्वी बांधलेले हे वाडे व इमारती जीर्ण झाल्या आहेत. यापूर्वी हे वाडे कोसळून दुर्घटना घडून जीवितहानी झाली आहे. त्यामुळे महापालिकेने धोकादायक इमारती व वाड्यांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून ते पाडण्यासाठी वाडे मालकांना नोटिसा दिल्या होत्या.

या वर्षी ११६ धोकादायक वाड्यांना नोटिसा देण्यात आल्या होत्या. यातील ७६ वाडे आतापर्यंत उतरविण्यात आले आहेत. तर ३७ वाडे धारकांकडून वाडे उतरविण्यास तीव्र विरोध होत आहे. काही ठिकाणी पर्यायी व्यवस्था नाही, तर मालकी हक्क व अन्य वाद असल्याने हा विरोध होत आहे. परंतु, जीवितहानी टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ३७ धोकादायक वाडे धारकांशी चर्चा करून काही पर्याय महापालिकेने सुचवले आहेत, यानंतरही विरोध होत असल्याने त्यांचे वीज आणि पाणी तोडण्यात येणार आहे. पोलिसांनाही पत्र देण्यात येत आहे. पोलिस बंदोबस्तात हे वाडे उतरविण्यात येतील. तत्पूर्वी पुन्हा नागरिकांना धोकादायक वाडे उतरवण्याचे आवाहन महानगरपालिकेने केले आहे.

## अनधिकृत इमारतीचा लाकडी सांगाडा तुटल्याने एका मजुराचा मृत्यू, तर चार जण जखमी

◆ **पुणे (प्रतिनिधी) :**

सरबतवाला चौक येथील साचापीर स्ट्रीट वरील घर क्र ५९४ व ५९५ चे अनधिकृत बांधकाम सुरू असताना इमारतीचे काम करण्यासाठी उभारण्यात आलेल्या लाकडी सांगाड्यावर असलेली फळी खाली कोसळली आणि त्यावर काम करणारे शुभंकर मंडल ह्या परप्रांतीय युवक मजुराचा जागीच मृत्यू झाला आहे. तर इतर ४ युवक हे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना आज दुपारी १ वाजेचा दरम्यान घडली. स्थानिक कार्यकर्ते दिनेश आंधळकर, यांच्या समय सूचकतेनंतर ही घटना



उघडकीस आली. एवढी मोठी घटना घडूनही, इमारतीचे मालक अथवा पुणे कँटोन्मेंट बोर्डाचे कुठलेही अधिकारी घटनास्थळी आले नसल्याने स्थानिकांत मोठा उद्रेक असल्याचे पाहायला मिळाले.

घडलेल्या घटनेनुसार साचापीर स्ट्रीट वरील जुने हॉटेल ओयसिस येथील जुना बंगाल क्र ५९४ व ५९५ चे मिळालेल्या परवानगीच्या विरुद्ध बांधकाम अनधिकृत रित्या सुरू होते. आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास येथे इमारतीचे काम करताना उभारलेल्या ३० फुटावरीतील लाकडी सांगाड्यावर पश्चिम बंगाल मधील १७ ते २४ वयोगटातील ५ तरुण कामगार काम करीत होते. अचानक हा लाकडी सांगाडा वरील फळी खाली कोसळली. त्यामुळे हे पाचही तरुण खाली कोसळले त्यादरम्यान शुभंकर मंडल ह्या तरुण कामगाराचा जागीच मृत्यू झाला तर त्याच्यासोबत असणारे इतर चार कामगार गंभीर जखमी झाले. त्यांना ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

### ट्रक-दुचाकीच्या धडकेत एक ठार, दोघे जखमी

**पुणे :** भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला असून, अन्य दोघेजण जखमी झाले आहेत. ही घटना पुणे-सोलापूर रस्त्यावरील वानवडी परिसरात घडली. या अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला आहे. रितेशकुमार महिंदरसिंग असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. दुचाकीस्वार शुभम ज्ञानेश्वर इंगळे आणि रवी चौरासिया हे जखमी झाले आहेत. याबाबत पोलिस हवालदार सचिन घोडके यांनी वानवडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकीवरून ट्रिपल सीट निघाले होते. वानवडीतील चौकात भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली.

# डिजिटल क्रांती नव्हे ही लोकचळवळ...

गेल्या १० वर्षांत भारतामध्ये डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून प्रशासन, सार्वजनिक सेवेसह अनेक क्षेत्रांत ऐतिहासिक बदल झालेले आपल्याला पाहायला मिळत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात डिजिटल इंडिया ही केवळ एक संकल्पना राहिली नाही, तर परिवर्तनाचा दूत ठरली आहे. तंत्रज्ञानातील या नव्या बदलामुळे ग्रामीण भागातही अनेक जणांच्या हाती काही ना काही नव्या वस्तू लागल्याचे दिसत आहे. भारतात डिजिटल क्रांती होईल का? असा प्रश्न सातत्याने विचारला जात होता. चलनातील नाणे, रोख रक्कम नसतील तर व्यवहार कसे होणार याबाबत १० वर्षांपूर्वी कोणाला प्रश्न विचारला असता, ते उत्तर नकारात्मक आले असते. त्याचे कारण मोठ्या संख्येने असलेल्या अर्धशिक्षित लोकांना हा डिजिटल व्यवहार जमणार कसा अशी सार्वत्रिक भावना होती. आज आपण बाजारात गेलो तर भाजीवाल्यांपासून चहाच्या टपरीवर गुगल पे, फोन पेने पैसे देतो. दुकानात स्कॅनर ठेवलेला असतो, त्यामुळे १० रुपयांचा कटिंग चहा प्यायल्यानंतरही खिशातील सुट्टे पैसे काढण्याची गरज उरत नाही. यूपीआयद्वारे चहावाल्यालाही पैसे पोहोचतात, ही साधी गोष्ट सर्वसामान्य नागरिकांच्या अंगवळणी पडली आहे. त्यामुळे मोबाईल, इंटरनेट कनेक्शन या गोष्टी तो घरातून बाहेर पडताना ध्यानात ठेवताना दिसतो. खऱ्या अर्थाने डिजिटल व्यवहाराचा चेहरा बदलण्यात युनिफाईड पेमेंट्स इंटरफेसचा (यूपीआय) मोठा वाटा आहे. दैनंदिन व्यवहाराचे यूपीआय हे प्रमुख माध्यम बनले आहे. मार्च २०२५ मध्ये केवळ एका महिन्यात यूपीआयच्या माध्यमातून २५ लाख कोटी रुपयांचे १८ हजार दशलक्ष व्यवहार झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. आज भारतात ४६० दशलक्षहून अधिक नागरिक आणि ६५ दशलक्षहून अधिक व्यापारी यूपीआयचा वापर करत आहेत. प्रत्येक भारतीयांसाठी पुरावा म्हणून ओळख असलेल्या आधार कार्डची डिजिटल ओळखसुद्धा अधिक विश्वासार्ह ठरली आहे. बँकांमधील ई-केवायसी सेवा सुटसुटीत झाली आहे.

भारतात १९९० च्या दशकाच्या अखेरीस प्रथमच मोबाइल फोन आले, तेव्हा ते फक्त श्रीमंतांसाठीचे यंत्र आहे अशी त्याची प्रतिमा तयार झाली होती. मात्र, पुढील काही दिवसांत भारत नावाच्या मोठ्या बाजारपेठेने मोबाइल यंत्रांची किंमत तर खाली आणली, पण ही बाजारपेठ काबीज करण्याच्या स्पर्धेने ही सेवा सर्वसामान्य भारतीयांना परवडेल इतकी खाली आणून ठेवण्याचा सरकारकडून प्रयत्न झाला. आता तर ग्राहक मिळविण्यासाठी ती सेवा मोफत दिली जात आहे आणि ती मोबाईल सेवा घेण्यासाठी भारतीय ग्राहकांच्या उड्या पडत आहेत. जगातील खरे बदल हे तंत्रज्ञानाने घडवून आणले आहेत, असे म्हणतात, ते खरे आहे, याची प्रचिती मोबाइल फोनच्या क्रांतीमुळे दिसून आली आहे. देश स्वातंत्र्य झाल्यापासून भारतात रोखीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत होते. त्यासाठी रिझर्व्ह बँकेला प्रचंड खर्च सहन करावा लागत होता. रोख वितरित करणे, ती सांभाळणे, ती सतत बदलत राहणे, खराब नोटांची विल्हेवाट लावणे हा भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कामाच्या दृष्टीने मोठा उपद्व्याप होता आणि आजही तो आहे. रोखीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये काळ्या पैशाने धुमाकूळ घातला होता, हे अनेक आर्थिक घोटाळ्यांच्या प्रकरणानंतर उघडकीस आले होते. त्यामुळे डिजिटल पेमेंटमुळे घोटाळ्यांना आळा बसण्यास सुरुवात झाली. तसेच डिजिटल व्यवहार वाढल्याने वाचणारी रक्कम रिझर्व्ह बँकेकडून केंद्र सरकारला दरवर्षी लाभांश रूपात दिली जाते, हा अप्रत्यक्ष फायदा आता दिसू लागला आहे.

डिजिटल व्यवहारांमुळे पारदर्शी व्यवहार वाढीला प्रोत्साहन मिळाले आहे. डिजिटल माध्यमातून होणाऱ्या व्यवहारातून सरकार जी सबसिडी देते, ती थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होत आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांची बचत होत असते. काळे व्यवहार करण्याला प्रोत्साहन देणाऱ्या ५०० रुपयांच्या नोटा जोपर्यंत व्यवहारात आहेत तोपर्यंत डिजिटल व्यवहारांना अपेक्षित गती मिळणार नाही, हे ओळखून आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या नोटा व्यवहारातून काढून टाकण्याची मागणी सातत्याने केली आहे. केंद्र सरकारने या मागणीकडे गांभीर्याने पाहिले तर पुढील काळात लवकरच भारतातही डिजिटल युगाचा आविष्कार पाहण्यास मिळेल, अशी आशा करायला हरकत नाही. केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' या कार्यक्रमाला दहा वर्षे पूर्ण झाली आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डिजिटल क्रांती ही केवळ एक प्रशासन योजना राहिली नाही, तर ती "लोकांची चळवळ" बनली आहे, असे मत मांडले. २०१४ मध्ये भारतात सुमारे २५ कोटी इंटरनेट कनेक्शन होते, जे आज ९७ कोटींहून अधिक झाले आहे.

दहा वर्षांपूर्वी इंटरनेटचा वापर मर्यादित होता, डिजिटल साक्षरता कमी होती आणि सरकारी सेवांमध्ये ऑनलाइन प्रवेश दुर्मीळ होता. भारतासारखा विशाल आणि भाषा, प्रांत रचनेमुळे विविधतेने नटलेल्या देशात खरोखर डिजिटल होऊ शकेल का याबद्दल अनेकांच्या मनात शंका होती. आज, या प्रश्नाचे उत्तर केवळ डेटा आणि डॅशबोर्डमध्येच नाही तर १४० कोटी भारतीयांच्या जीवनात प्रत्यक्षात उतरलेले पाहायला मिळत आहे. बनारसी विणकरांपासून ते नागालँडमधील बांबू कारागिरांपर्यंत, विक्रेते आता मध्यस्थाशिवाय डिजिटल व्यासपीठामुळे देशभरातील ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. मोदी यांच्या नेतृत्वामुळे गेल्या १० वर्षांत डिजिटल क्रांतीला जो वेग मिळाला, त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. गेल्या ११ वर्षांत भारताने डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून प्रशासन, सार्वजनिक सेवा आणि अनेक क्षेत्रात ऐतिहासिक बदल पाहिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात डिजिटल इंडिया ही केवळ एक संकल्पना ठरली नाही तर परिवर्तनाचा दूत ठरली आहे. तंत्रज्ञानातील नवीन झेप ग्रामीण भागात बदलाचा पाचा रोवणारी ठरली. या नव्या बदलामुळे ग्रामीण भागातही अनेक जणांना काही ना काही हाती लागले. त्यांना काहीतरी गवसले.

# प्रदेशाध्यक्षपदी कोकणपुत्र भाजपायी...!

महाराष्ट्र प्रदेश भाजपाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे कोकणचे सुपुत्र, माजी मंत्री आ. रवींद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. निवड झाल्यानंतर, 'माझी आज या पदावर निवड झाली आहे. खरेतर भाजपाने मला हे पद देऊन माझ्यावर उपकार केले. माझी ओळख ही भारतीय जनता पार्टी आहे. मी २००२ साली पक्षाच्या कामाला सुरुवात केली. तिथून काम करत एक सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता, भाजपाचा अध्यक्ष होतो, हे कुठल्याच पक्षात होणार नाही. त्यामुळे हे माझ्यावर उपकार आहेत. भारतीय जनता पार्टीची राष्ट्रवादाची विचारधारा तसेच मोदी सरकारचे लोकोपयोगी निर्णय राज्याच्या कानाकोपऱ्यांत जाऊन सामान्य माणसांपर्यंत नेऊन पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांच्या साथीने पार पाडेन,' असे ते म्हणाले. तर भाजपाचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या रूपाने तळागाळातील हाडाचा कार्यकर्ता पक्षाचा प्रदेशाध्यक्ष झाला आहे. भाजपा ही कार्यकर्त्यांची पार्टी असून सामान्य कार्यकर्ता पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो, हे केवळ भाजपामध्येच शक्य आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांचे कौतुक केले.

भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण हे कोकणचे सुपुत्र आहेत. मात्र, त्यांचे कार्यक्षेत्र मुंबई-डोंबिवली आहे. आ. रवींद्र चव्हाण यांची प्रदेशाध्यक्षपदावरची निवड जरी अपेक्षित मानली गेली तरीही आ. रवींद्र चव्हाण यांचे गेल्या काही वर्षांतील भारतीय जनता पक्षाचा 'कार्यकर्ता' म्हणून असलेलं कार्यच त्यांना प्रदेशाध्यक्षपदापर्यंत घेऊन गेले आहे. भारतीय जनता पक्षाच्या पक्षीय कार्यामध्ये आ. रवींद्र चव्हाण युवामोर्चापासून कार्यरत होते. पक्षीय स्तरावर प्रदेश भाजपाचे महामंत्री म्हणूनही त्यांनी यापूर्वी काम पाहिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेत वाढलेल्या आ. रवींद्र चव्हाण यांनी नेहमीच पक्षाला अग्रस्थानी ठेऊन काम केले. भाजपा युवा मोर्चा, प्रदेश महामंत्री या पदांवर काम करताना आ. रवींद्र चव्हाण यांनी पक्षीय काम करताना भाजपा कसा वाढेल यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे साहजिकच कोकणातील एक व्यक्ती मुंबईत जाऊन स्थिरावतो. निव्वळ स्थिरावतोच असं नाही तर मुंबईतील डोंबिवली भागात डोंबिवलीकरांना सोबत घेत डोंबिवली-कल्याण महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून काम केले. पक्षीय कामामुळे डोंबिवलीतील नागरिकांशी संवाद होताच. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे



चंद्रशेखर बावनकुळे यांच्यानंतर भाजपाचा प्रदेशाध्यक्ष कोण होणार याची चर्चा सुरू होती. मंत्रिमंडळ विस्तारात रवींद्र चव्हाण यांना स्थान देण्यात न आल्याने त्यांच्याच नावाची शक्यता अधिक होती. अखेर भाजपाचे नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू, माजी मंत्री आणि विद्यमान प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली अन् रवींद्र चव्हाण हे भाजपाचे १२वे प्रदेशाध्यक्ष ठरले...

नगरसेवक म्हणून विकासकामात सहभाग घेण्याची त्यांना संधी मिळाली. त्यानंतर आ. रवींद्र चव्हाण यांना डोंबिवलीचे आमदार होण्याची संधी मिळाली. महायुतीच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री म्हणून आ. रवींद्र चव्हाण यांना संधी दिली गेली. राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून संधी मिळाली तेव्हा त्यांनी कोकणसाठीही निधी उपलब्ध करून दिला. मागील सहा महिन्यांपूर्वीपासून आ. रवींद्र चव्हाण यांना नव्याने स्थापित झालेल्या महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नव्हते. त्याचवेळी प्रदेशाध्यक्ष पदांवर आ. रवींद्र चव्हाण यांच्या नावाची चर्चा सुरू झाली होती. महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदावर महाराष्ट्राचे महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे कार्यरत असताना महाराष्ट्र प्रदेश भाजपा कार्याध्यक्ष पदाची सूत्र आ. रवींद्र चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आली. भाजपाच्या प्रदेशांच्या निवडीचा कार्यक्रम जाहीर झाल्यावर निवड प्रक्रियेत प्रदेशाध्यक्षपदांसाठी आ. रवींद्र चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला त्याचवेळी गेली सहा महिने प्रदेशाध्यक्षपदावर आ. रवींद्र चव्हाण यांच्या निवडीच्या चर्चेला खऱ्याअर्थाने पूर्णविराम



**माझे कोकण**

**संतोष वायंगणकर**

मिळाला. नेहमीच पक्षीय कामाची आवड असणाऱ्या आ. रवींद्र चव्हाण हे पक्ष वाढविण्यासाठी निश्चितच प्रयत्न करतील. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आदी स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका दिवाळीदरम्यानच्या कालावधीत होण्याची शक्यता गृहीत धरूनच महाराष्ट्रातील सर्वच राजकीय पक्ष स्वतःच्या पक्षाची रेषा मोठी करण्याच्या प्रयत्नाला लागले आहेत. महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस उपमुख्यमंत्री अजितदादा पवार गट, आरपीआय रामदास आठवले गट अशा चार मित्रपक्षांची मिळून महायुती आहे. तर राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पावर गट, शिवसेना उद्धव ठाकरे गट या चार पक्षांची महाविकास आघाडी आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात महायुती व महाविकास आघाडीचं राजकारण आहे. या महायुतीमध्ये राज्यात आपापल्या पक्षाच्या वाढीसाठी प्रयत्न करीत आहेत. महाविकास आघाडीत कोणाचा ताळमेळ कोणातच नाही अशीच काहीशी महाराष्ट्रात आणि कोकण भागात ही स्थिती आहे. महाविकास आघाडीतील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढविण्यासाठी प्रयत्नशील आहे तशी स्वबळाची चर्चाही राज्यात सुरू झाली आहे. अर्थात आजच्या घडीला कोकणाच्या राजकारणात महाविकास आघाडीतील घटक पक्ष स्वतःच्या अस्तित्वाच्या शोधात आहेत. मराठीच्या मुद्द्याआडून कोकणातील काही तालुका शहरामध्ये मनसे आणि उद्धव ठाकरे सेनेने श्रेय घेण्याचा प्रयत्न केला; परंतु त्यातूनही महाविकास आघाडीला कोणताही राजकीय फायदा होणार नाही. कोकणातील राजकारण हे सध्या तरी महायुती भोवतीच फिरणारे आहे.

महाराष्ट्रात नजीकच्या काळात होऊ घातलेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपंचायत, महानगरपालिका अशा स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्या पार्श्वभूमीवर सत्तेवर असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी एका कोकणच्या सुपुत्रावर सोपविण्यात आली आहे. फार भाष्य न करणे, मनातील कोणतेही मनसुबे चेहऱ्यावर उमटू न देता निर्विकार चेहऱ्याने त्यांचा असलेला सर्वत्रचा वावर, आ. रवींद्र चव्हाण यांच्या मनात नेमकं काय चाललंय याबद्दल चेहऱ्यावर पुसटशीही एक रेषाही उमटू न देता धीरगंभिरतेने राजकारण करण्याचा त्यांचा स्वभाव दिसतो. शिवसेना एकनाथ शिंदे गट आणि अजितदादा पवार राष्ट्रवादी गट अशा दोन मित्र पक्षांना सोबत घेत प्रदेशाची राजकीय पक्षीय रणनिती आखण्याची मोठी जबाबदारी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून आ. रवींद्र चव्हाण यांच्यावर आहे. अर्थात भारतीय जनता पक्षामध्ये असलेल्या कोअर कमिटी सर्व रणनिती निश्चित केल्यावर त्यावर शिक्कामोर्तब केला जातो असे म्हटले जाते. महायुतीतील सर्वच मित्रपक्ष पक्षीय वाढविण्यासाठी आपापल्या पद्धतीने प्रयत्न करत असताना शतप्रतिशत भाजपा हा भाजपाचा अजेंडा फार पूर्वीपासूनचा आहे. कोकणात भाजपाबरोबरच एकनाथ शिंदे यांची शिवसेनाही आपली ताकद वाढविण्याच्या कामाला लागली आहे. कोकणात सर्वच राजकीय पक्षांना अस्तित्व टिकवून ठेवणं आणि आपलं वर्चस्व नव्हे तर प्राबल्य दाखविण्याचा प्रयत्न सर्वांनाच करावयाचा आहे. स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा जवळ येतील तशीच त्याची अधिक गती वाढणार आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष पदावर कोकणच्या एका सुपुत्राची वर्णी लागली आहे. आ. रवींद्र चव्हाण मित्रपक्षांना सोबत घेत महाराष्ट्राच राजकारण कशा पद्धतीने करतात हे पाहणं फार औत्स्युक्याचं ठरेल.

# दुबार पेरणीचे संकट टळले...

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात सर्वसाधारण ४९ लाख ७२ हजार ७२८ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेच २४ लाख ४५ हजार ९४९ हेक्टरवर म्हणजेच ४९.१९ टक्के क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. यंदाच्या खरीप हंगामासाठी मराठवाड्यातील जे क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले, त्यामध्ये नांदेड जिल्ह्यासाठी ७ लाख ६१ हजार ५७६ हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमधील ६ लाख ८१ हजार ९०३ हेक्टर, जालन्यातील ६ लाख ५१ हजार १७३ हेक्टर, बीडमधील ८ लाख ८ हजार ९४५ हेक्टर, लातूरमधील ५ लाख ८६ हजार १०१ हेक्टर, धाराशिवमधील ५ लाख ५४ हजार ३६० हेक्टर, परभणीतील ५ लाख ४ हजार ६८ हेक्टर, हिंगोलीतील ४ लाख १० हजार ३९८ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. त्यापैकी २४ लाख ४५ हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपाची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या क्षेत्रामध्ये नांदेड जिल्ह्यात ४,८५,२८० हेक्टर, छत्रपती संभाजीनगरमधील ३,९४,९४९ हेक्टर, जालन्यातील १,९७,६६४ हेक्टर, बीडमधील १,९१,९०८ हेक्टर, लातूरमधील ४,३५,००१ हेक्टर, धाराशीवमधील ४,०६,०६६ हेक्टर, परभणीतील २,५५,७३७ हेक्टर व हिंगोलीमधील सर्वसाधारण क्षेत्राच्या तुलनेत ७९ हजार ३११, हेक्टर क्षेत्रावरील पेरणीचा समावेश आहे. मराठवाड्यात मागील दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे पिके तरली आहेत. आता शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. काही ठिकाणी रिमझिम पाऊस झाला, त्यामुळे कोवळ्या पिकाला देखील जीवदान मिळाले आहे.

### 'दुबार'चे संकट टळले

मराठवाडा व विदर्भात पाऊस नसल्याने बळीराजा संकटात सापडला होता. मराठवाड्यात तर कडक उन्हाळा असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात दुबार पेरणीची भीती व्यक्त केली जात होती; परंतु अखेर निसर्गाने तारल्यामुळे नांदेड जिल्ह्यात २ दिवसांपूर्वी चांगलाच पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील ३९ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने दुबार पेरणीचे संकट तूर्त तरी टळले आहे. नांदेड जिल्ह्यातील ६ तालुक्यात चांगलाच पाऊस झाला. त्यामुळे बिलोली, कुंडलवाडी, हदगाव, नांदेड, भाकर, किनवट, माहूर या भागात शेतकऱ्यांना आता दुबार पेरणी करण्याची गरज नाही. नांदेड जिल्ह्यातील काही तालुक्यात परिस्थिती अजूनही कठीणच आहे. अशीच परिस्थिती हिंगोली व परभणी जिल्ह्यातही निर्माण झाली आहे. पाऊस नसला तर शेतकरी राजा परेशान होतो. मराठवाड्यात तसेच विदर्भात पाऊस परतल्याने आनंदी-आनंद व्यक्त केला जात आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील दहेली मंडळात एकाच दिवसात १४७ मिलिलिटर पाऊस झाला. आणखी तीन दिवस मराठवाड्यात चांगला पाऊस राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे. विदर्भातील यवतमाळ, वाशिम तसेच बुलढाणा भागात पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. विदर्भातील या तीन जिल्ह्यांतील अनेक मार्ग ठप्प झाले आहेत. वर्धा जिल्ह्यात तर वीज पडल्याने दोन भावंडांचा जागीच मृत्यू झाला. मराठवाड्यात दीर्घ खंडानंतर पावसाचे पुनरागमन झाले



गेल्या दहा वर्षांत पावसाचे कोणतेही वेळापत्रक राहिलेले नाही. अतिवृष्टी, अवर्षणासारख्या प्रकाराबरोबरच पाऊस पडला तर सलग पडणे, गायब झाला तर सलग वीस वीस दिवस गायब होणे असे प्रकार होत असल्याने पर्यावरणातील बदल व अनिश्चितता लक्षात घेऊन मगच शेतीच्या कामाचे नवीन वेळापत्रक शेतकऱ्यांनी बनवणे गरजेचे आहे. मराठवाड्यात तर कडक उन्हाळा असल्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यात दुबार पेरणीची भीती व्यक्त केली जात होती; परंतु अखेर निसर्गाने तारल्यामुळे नांदेड जिल्ह्यात २ दिवसांपूर्वी चांगलाच पाऊस झाला. नांदेड जिल्ह्यातील ३९ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने दुबार पेरणीचे संकट तूर्त तरी टळले आहे.

**मराठवाडा वार्तापत्र**

आहे. सर्वदूर मध्यम स्वरूपातील पाऊस सुरू असून आणखी दमदार पाऊस झाला तर उरलेल्या भागालाही दिलासा मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद, कन्नड, सिल्लोड, फुलंब्री, वैजापूर या भागातही चांगलाच पाऊस झाला. हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी, औंढा नागनाथ, जिंतूर या ठिकाणी पावसाने चांगलीच हजेरी लावली. त्यामुळे या तीन भागातील दुबार पेरणी टळली आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यात दमदार पाऊस झाला. त्याठिकाणी देखील आता दुबार पेरणी करण्याची गरज नाही. शेतकरी पाऊस नसल्यामुळे आकाशाकडे डोळे लावून बसला होता. अनेक ठिकाणी बियाणेच बोगस निघाल्यामुळे पेरणी करूनही पिकाची उगवण झाली नाही.

मराठवाड्यात मूग, ज्वारी, कापूस, सोयाबीन, तूर, उडीद आदी पिके प्रामुख्याने घेतली जातात. सध्याही यापैकी सोयाबीनचे पीक घेण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे. मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात मात्र पावसाने हात आखडता घेतला आहे. ८ दिवसांपासून त्या ठिकाणी पावसाचा खंड पडला आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत मे महिन्यात पाऊस झाला. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना मशागत करायलाही पूर्व मोसमी पावसाने निट संधी दिली नाही. मात्र शेतकऱ्यांनी त्यानंतर पेरणीयोग्य मशागत केली.

बीड जिल्ह्यात या महिन्यात १ जूनपासून सरासरी ५० टक्के पाऊस पडला. बीड जिल्ह्यात खरिपाचे सर्वसाधारण क्षेत्र ८ लाख ८ हजार हेक्टर आहेत. मात्र या तुलनेत साडेपाच लाखांच्या जवळपास पेरणी झाली. बीड जिल्ह्यात ६८ टक्के पेरणी उरकली आहे. नांदेड जिल्ह्यात ५ लाख हेक्टरवर पेरणी पूर्ण झाली आहे. खरीप हंगामासाठी ७ लाख ६१ हजार ५७६ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले. त्यापैकी ४ लाख ८५ हजार २८० हेक्टरवर पेरणी झाली आहे.

**- अभयकुमार दांडगे**

## राशिभविष्य

गुरुवार, ३ जुलै २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती आषाढ शुद्ध अष्टमी शके १९४७, चंद्र नक्षत्र हस्त योग परिघ चंद्र राशी कन्या, भारतीय सौर १२ आषाढ शके १९४७, गुरुवार दि. ३ जुलै २०२५, मुंबईचा सूर्योदय ६.०४, मुंबईचा सूर्यास्त ७.२०, मुंबईचा चंद्रोदय १.०३, मुंबईचा चंद्रास्त ००.५३, उद्याची राहू काळ २.२१ ते ४.०१, दुर्गाष्टमी, शुभ दिवस.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : मानसिक स्वास्थ्य लाभणार आहे.

**वृषभ** : व्यापार व्यवसायातील यश आपणास प्रगतिपथावर नेणार आहे.

**मिथुन** : सहल किंवा मनोरंजनाचे कार्यक्रम आखणार आहात.

**कर्क** : महत्त्वाची कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न कराल.

**सिंह** : धार्मिक कार्यक्रमानिमित्त प्रवास करण्याची शक्यता आहे.

**कन्या** : आपली निर्णय क्षमता कमी होण्याची शक्यता दिसते आहे.

**तूळ** : दिवस आपणास चांगला जाईल.

**वृश्चिक** : विचारपूर्वक कामे करा.

**धनू** : व्यवसायात चांगला जम बसणार आहे.

**मकर** : घरच्यांची संवाद साधण्याचा प्रयत्न कराल.

**कुंभ** : नवीन संधी प्राप्त होतील.

**मीन** : आपल्याला आत्मिक बल वाढणार आहे.

## जनसंवाद

### नवीन घोटाळ्यांचे संकट तर नाही...

रेल्वेच्या ईएमयूमधील प्रत्येक कामगार ३५ वर्षांपासून कुशलतेने व प्रशिक्षणाच्या आधारे प्रामाणिकपणे सर्व कामे करीत असताना आणि त्यांच्या भरवशावर मुंबईकर आपली जीवनवाहिनी असलेल्या लोकलने सुखरूप प्रवास करत असताना माटुंगा प्रशासन कोट्यवधी रुपयांचा ठेका ठेकेदारांना देण्यास आग्रही असल्याचे वृत्त अतिशय चीड आणणारे आहे. लोकलचे अभियांत्रिकी काम ठेकेदारांच्या अप्रशिक्षित कामगारांकडून करून ठेकेदारांवर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करण्याची रेल्वे प्रशासनाची भूमिका एक नवीन घोटाळ्याचे संकेत तर देत नाही ना? कामगारांना डावलून ठेकेदारांचे हित जपणाऱ्या रेल्वे प्रशासनाविरोधात सर्वच रेल्वे कामगार संघटना एकवटल्याने रेल्वे प्रशासन आणि ठेकेदार यांची मिलीभगत असल्याच्या दाट संशय येतो.

**-चंद्रशेखर कमळाकर दाभोळकर**, भांडुप

### इंदूर बनले डिजिटल

शहरातील प्रत्येक घराला 'युनिक क्यूआर कोड'सह डिजिटल घर पत्ता देणारे मध्य प्रदेशातील इंदूर हे देशातील पहिले डिजिटल पत्ता असलेले शहर बनले आहे. इंदूरच्या सुदामा नगरमध्ये युनिक क्यूआर कोडसह डिजिटल प्लेट्स बसवून या विषयीचा पथदर्शी प्रकल्प नुकताच सुरू करण्यात आला. या आनुषंगाने शहरातील प्रत्येक घराबाहेर युनिक क्यूआर कोडसह विशेष डिजिटल प्लेट्स बसवण्यात येणार आहेत. महिन्याभरापूर्वीच भारतीय पोस्ट विभागाने एखाद्या जागेच्या अचूक अक्षांश आणि रेखांशावर आधारित एक १० अंकी 'डिजीपिन' नावाची डिजिटल पत्ता प्रणाली सादर केली होती. त्या प्रणालीशी हा डिजिटल घर पत्ता प्रकल्प जोडण्यात आला आहे. मोबाईल फोनने घराबाहेर प्लेट्सच्या स्वरूपात असलेला युनिक क्यूआर कोड स्कॅन करताच, वीज, पाणी, मालमत्ता कर, बिल भरणे, सुविधांबाबत तक्रारी नोंदवणे इत्यादी विविध वीस नागरी सुविधा नागरिकांना उपलब्ध होणार आहेत. तसेच जीपीएस आधारित घराचा डिजिटल पत्ता कळू शकेल. दोन महिन्यांपूर्वी शहरातील सर्व भिकाऱ्यांचे पुनर्वसन करून इंदूर शहर देशातील पहिले भिकारीमुक्त शहर बनले. तसेच गेली अनेक वर्षे देशातील सर्वात स्वच्छ शहर म्हणून इंदूर शहराला प्रथम क्रमांक मिळतो आहे. इंदूर शहराचे हे विधायक कार्य प्रशंसनीय असून देशातील इतर शहरांसाठी आदर्शवत असे आहे.

**- प्रदीप मोरे**, अंधेरी

### उत्पादनांना जीएसटी का?

१ जुलै २०१७ रोजी सुरू झालेल्या वस्तू आणि सेवा कराला सोमवारी आठ वर्षे पूर्ण झाली. सरासरी मासिक जीएसटी संकलन २०१७-१८ मध्ये ९०,००० कोटी रुपयांवरून वाढून एप्रिल २०२५ मध्ये कर संकलनाने २.३७ लाख कोटी रुपयांचा विक्रमी उच्चांक गाठला. पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू आणि इतर पेट्रोलियम उत्पादने जीएसटी व्यवस्थेतून वगळण्यात आली. केंद्रीय उत्पादन शुल्क आणि राज्य व्हॅट काढून पेट्रोलियम उत्पादनांना जीएसटीखाली आणल्यास कर संकलन मोठ्या प्रमाणात वाढेल. केंद्र सरकार असे धाडस करू शकेल का? सध्या पेट्रोलच्या किमतींचे नियमन राज्यांच्या नियंत्रणाखाली आहे. पेट्रोलियम उत्पादनांना जीएसटी अंतर्गत आणल्याने संपूर्ण देशभरात या वस्तूंसाठी एकच किंमत सुनिश्चित होईल आणि इंधनाच्या दरात पारदर्शकता येईल. पेट्रोलियम उत्पादनांना जीएसटी लावल्यास पेट्रोलचे दर कमी होतील.

**- विवेक तवटे**, कळवा

### हिंदी सक्ती निकाली

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार राज्यात हिंदी सक्तीचा जीआर निघाला आणि रद्द देखील झाला. विरोधक विशेषतः शिवसेना उबाठा गट आणि मनसे पक्षाने हिंदी सक्तीच्या विरोधात कमालीची आघाडी घेतली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने तिसरी भाषा सक्तीचा निर्णयच माघारी घेण्याचे ठरविले. शिवसेना उबाठा गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांनी आक्रमक होऊन हिंदी सक्तीचा मुद्दा उचलून धरला होता, नेमके त्याच वेळेला मनसेसारख्या पक्षाने देखील साथ देत दोन्ही ठाकरे बंधूनी हिंदी भाषा सक्तीच्या विरोधात एकत्र येण्याचे ठरविले होते पण योगायोगाने हिंदी सक्तीचा विषयच सरकारने निकाली काढला. मुंबई महापालिकेच्या निवडणुका येत्या चार महिन्यांत कधीही होऊ शकतात आणि अशावेळी नेमके मनसे आणि शिवसेना उबाठा गटाची जवळीक बरच काही सांगून जात आहे. त्यामुळेच दोन्ही बंधू एकत्र आल्यास मविआमध्ये बिघाडी मात्र नक्की होऊ शकते, असे वाटते.

**- संजय साळगांवकर**, कुर्ला

### गणेशमूर्ती केंद्र उभारताना...

श्री गणेशमूर्ती बनवणारी आणि तयार गणेशमूर्तीची विक्री केंद्रे शहारासारख्या ठिकाणी उभारली जाऊ लागली आहेत. ही केंद्रे उभारण्यासाठी मूर्तिकारांना आणि मूर्ती व्यवसायिकांना महापालिकेची परवानगी अनिवार्य असून पालिकेने निर्देशित केलेल्या नियमांचेही पालन करावे लागते. वाहतुकीस अडथळा होणार नाही अशाच ठिकाणी ही विक्री केंद्रे उभारण्यास परवानगी मिळत असल्याने काही ठिकाणी रस्त्यांच्या कडेला केराच्या डब्यांजवळ ही विक्री केंद्रे उभारण्यास परवानगी दिली जाते. गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असल्याने साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी येणार आहेत या भावनेने श्रद्धाळू त्याच्या स्वागताची आणि मुक्कामाची घरी सिद्धता करत असतो. आपल्या श्रद्धास्थानाला केराजवळ पाहून कोणत्याही गणेशभक्ताला वाईट तर वाटणारच. त्यामुळे श्री गणेश मूर्तिकारांनी आणि मूर्ती व्यवसायिकांनी अशा अयोग्य ठिकाणी विक्री केंद्रे उभारू नयेत. तसेच पालिकेनेही परवानगी देताना या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे.

**- जगन घाणेकर**, घाटकोपर

### विजयोत्सव अर्थात विजय यात्रा...

हिंदी भाषेचा आपल्याला तिटकारा नाही म्हणायचे आणि जीआर निघाल्यावर आंदोलन, प्रतीकात्मक जाळपोळ करायची हे प्रकार आता किळसवाणे झालेत. गोंधळ न होता एखाद्या गोष्टीची पूर्तता होत नसेल तर तो रद्द करणे. याचा अर्थ आंदोलकांनी विजयोत्सव साजरा करणे असा मुळीच अभिप्रेत नाही. आपली परंपरा, संस्कृती, धार्मिक भावना जागृती, निसर्गाला कुशीत घेतलेल्या वसंत ऋतूचा उत्साह त्याचे स्वागत, नवचैतन्य, धार्मिक संघटनांची एकजूट, लोकप्रियता, अनेक संकल्पनांचा प्रचार, नेतृत्व वाढ, राजकीय ताकद, संदेश, एकजुटता आणि शक्तिप्रदर्शन अशा गोष्टींसाठी विजयोत्सव साजरा केला जातो. जीआर अनेक निघतात व रद्द केले जातात त्यामागचा हेतू समजून घेणे गरजेचे असते. त्यासाठी विजययात्रा म्हणजे विनोदाचा विषय असेल. शक्तिप्रदर्शन करून वर्तमान सरकार पडेल अशीही परिस्थिती नाही मग जनतेला वेठीस धरून काय साध्य होणार.

**- अमोल करकरे**, खेड-रत्नागिरी




# ब्रह्मर्षी अत्री



प्रजापतीने सृष्टीची निर्मिती केली तेव्हा त्याला वाटले, आपण निर्माण केलेल्या या सृष्टीसमोर युगानुयुगे सत्कार्याचा आदर्श उभा करतील, अशा तेजस्वी विभूतींचा अवतार व्हावा, यासाठी त्याने एका त्रिसंवत्सर यज्ञसत्राचे आयोजन केले होते. अशा दीर्घ सत्रात कथा, गायन, कीर्तन होत असतेच. शास्त्रशुद्ध आरोह अवरोहानी युक्त अशा अव्याहत चालणाऱ्या वेदमंत्रांनी तसेच सुस्वर सामगायनाने त्या सत्रात साक्षात वाक्देवी प्रकट झाली. तिला पाहताच प्रजापती व वरुणदेवता या दोहोंची नवनिर्माणाची कामना उफाळून आली. त्या कामनेचे ओजस्वी वीर्य वाऱ्याने यज्ञाग्नीत टाकले गेले. तेव्हा त्यातून भृगू आणि अंगिरा ही अग्नीसारखी तेजोमय अशी सुंदर बालके जन्माला आली. त्या बालकांना पाहून अजून असेच बालक आपल्याला मिळावे म्हणून वाक्देवीने प्रजापतीला विनंती केली. तिची विनंती मान्य करून प्रजापतीने अजून एक तसाच दिव्य पुत्र उत्पन्न केला. तेच अत्री ऋषी होत. म्हणजेच अत्रीमहर्षींचे पिता साक्षात विधाता प्रजापती आणि माता प्रत्यक्ष वाक्देवी सरस्वती...!

अत्री ऋषी भृगू व अंगिरा ऋषींइतकेच तेजस्वी असले तरी त्यांची तेजस्विता शीतल चांदण्यासारखी होती. ते मुळात सौम्य, मधुर आणि विशाल अंतःकरणाचे महर्षी होते. मात्र अन्यायी, लालची लोकांवर ते प्रखरपणे प्रहारही करतात. जुलमी राजवटीविरुद्ध लोकशाहीचा पुरस्कार करणारे अत्रीमहर्षी पहिले द्रष्टे होत. तसेच सूर्यग्रहणाबद्दल लोकांची भयग्रस्त कल्पना काढण्यासाठी ग्रहणाचे अचूक गणित मांडणारे अत्रीमहर्षीच होत. सत्त्व, रज, तम या त्रिगुणांच्या पलीकडे असणाऱ्या शुद्ध सत्त्वात स्थिर असल्यामुळे ते अत्री मानले जातात. स्वायंभुव, स्वारोचित आणि वैवस्वत या तिन्ही मन्वतरातील सप्तर्षींमध्ये अत्री महर्षींची गणना होते. म्हणजे या तिन्ही मन्वंतरात अत्रीमहर्षी लोकांच्या नजरेसमोर आदर्शभूत होते. हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र म्हणजेच ब्रह्मदेवाची उत्कृष्ट निर्मिती होते. यांची उत्पत्ती ब्रह्मांच्या डोळ्यांपासून झाली, असेही मानले जाते. साक्षात ब्रह्मांचेच डोळे, म्हणजे त्या डोळ्यांत अवघ्या जगाबद्दलची वत्सलता, करुणा ओतप्रोत भरलेली असणार, ज्ञानाचे दिव्य तेज विलसत असणार ! आणि त्या डोळ्यांपासून अत्रींची उत्पत्ती झाली म्हणजे वात्सल्याची, करुणेची, ज्ञानाची गंगा अत्रींच्या रूपाने वाहू लागली. ऋग्वेदाचे पाचवे मंडल याची साक्ष देते. ८७ सूक्तांच्या या मंडलास आत्रेय मंडल म्हणतात. या मंडलाचे द्रष्टे महर्षी अत्री होत. यात ऋग्वेदीय स्वस्तिसूक्त आहे. यास कल्याणसूक्त, मंगलसूक्त, श्रेयसूक्तही म्हटले जाते. आजही हे सूक्त प्रत्येक मंगल कार्यात शुभ संस्कारांसाठी, कल्याण, अभ्युदय, भगवत्कृपेसाठी सस्वर पठन केले जाते. त्यातून अत्रीमहर्षींची उदात्त लोककल्याणाची भावना प्रकट होते.



भारतीय ऋषी

डॉ. अनुराधा कुलकर्णी

स्वस्ति पन्थां अनु चरेम सूर्यचन्द्रमसौ इव ।
पुनः ददता अघ्नता जानता सं गमेमहि ।।
ऋ. मं. ५सू. ५१. १५

आम्ही सूर्यचन्द्रांप्रमाणे कल्याणप्रद मार्गच अनुसरावा. कोणाचाही द्वेष न करता, गरजवंतांना वारंवार दान देऊन समर्थ करीत, ज्ञानसंपन्न होऊन एकजुटीने या भवसागराला पार करावे, असे उदात्त भाव अत्री महर्षींच्या ऋचेत आहेत. त्यांचे खालील पर्जन्यसूक्तही खूप सुंदर आहे. त्याचा मी भावानुवाद केला आहे.

**प्रवाताः वान्ति पतयन्ति विद्युतः उत्**
**ओषधीः जिहते पिन्वते स्वः।**
**इरा विश्वस्मै भुवनाय जायते यत्**
**पर्जन्यः पृथिवीं रेतसा अवति ।।४।।**
**यस्य व्रते पृथ्वी नन्नमिती यस्य व्रते**
**शफवत् जर्भुरीति ।**
**यस्य व्रते ओषधीः विश्वरूपाः**
**सः नः पर्जन्य महिसर्म यच्छ ।।**
**ऋ.मं.५सू.८३.५।।**

**जलवीर्य घेऊनि मेघ आले पृथ्वीकडे**
**धावत ।वाहू लागला पवनही वेगे अति**
**उत्साहभरीत ।।**
**विजेचेही नर्तन चाले कडकडणाऱ्या**
**तालावरती ।वसुंधरेला भेटायाला कधी**
**आवेगे ये चपला ती ।।**
**पर्जन्याचे जल पिऊनि ये तरारुनि वन**
**हे सारे ।स्वच्छ होऊनि आसमंत समृद्धीची**
**उघडी दारे ।।**
**विश्वहितास्तव सस्यश्यामला वसुधा**
**झाली ।त्या भूमीच्या स्तन्यावरती**
**जीवलेकरे पुष्ट झाली ।।**
**ज्याच्यामुळे तृप्त होऊनि धनधान्य**
**धरणी देई ।ज्याच्यामुळे गोधन सारे सतेज**
**संपन्न होई ।।**
**ज्याच्यामुळे वृक्षवल्लरी टवटवीत**
**सुरंगी झाली ।तो पर्जन्य आम्हालागी**
**समृद्धीचा होई वाली ।।**

(पूर्वार्ध)

anuradha.klkrn@gmail.com

# मनातील ज्ञानाचा प्रकाश पसरवणारे गुरुनानक

गुरुनानक यांना त्यांचे भक्त बाबा नानक, गुरुनानक, नानक देव इत्यादी नावांनी ओळखतात. गुरुनानक यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी म्हणजेच अशा काळात झाला होता जेव्हा धर्माच्या नावावर अंदाधुंदी माजली होती. त्यांचा जन्म पाकिस्तानमधील पंजाब प्रांतात येणाऱ्या तलवंडी इथे झाला. काही शीख धर्मीय गुरुनानकांचा जन्म हा कार्तिक पौर्णिमेला साजरा करतात. याला गुरुनानक पौर्णिमा पण म्हणतात. अर्थात गुरुनानक यांच्या जन्माविषयी दुमत आहेत, पण वैशाख महिन्यात म्हणजेच एप्रिलला त्यांचा जन्म झाल्याचे लोक मानतात, तर कार्तिक पौर्णिमेला त्यांना अध्यात्मिक ज्ञान प्राप्त झाले. म्हणून अध्यात्मिक मार्गातील हा त्यांचा जन्म समजला जातो.



आत्मज्ञान

प्राची परचुरे वैद्य

त्यांच्या आईचे नाव त्रिप्ता माता व वडिलांचे नाव कल्याण चंद दास बेदी. त्यांचे वडील पटवारीचे काम करायचे म्हणजे आजच्या भाषेत अकाउंटंट. नानक लहान मुलांमध्ये खेळायचे, पण इतरांपेक्षा ते नेहमी वेगळा विचार करायचे. थोडे मोठे होताच नानक आपल्या वडिलांना अनेक प्रश्न विचारू लागले. त्यांचे वडील शक्य तितक्या प्रश्नांची उत्तरे देत असत; परंतु सर्वच प्रश्नांची उत्तरे त्यांच्याजवळ नसत. त्यांच्या वडिलांनी नानक यांना हरदयाल नावाच्या एका शिक्षकाकडे शिक्षणासाठी पाठवले. तिथे देखील नानक आपल्या शिक्षकांना प्रश्न विचारत, पण त्यांना अपेक्षित उत्तरे कधी मिळाली नाही. त्यांचे प्रश्न पाहून इतरांपेक्षा नानक वेगळे आहेत हे त्यांच्या गुरूंना समजले होते.

शिक्षण पूर्ण झाले आणि नानक जाणते झाले. त्यांची बहीण 'नानकी' हिचा विवाह जय राम नामक व्यक्तीसोबत झाला होता. तो दिल्लीच्या सुलतानांच्या हाताखाली काम करायचा. त्याच्याच सांगण्यावरून नानक हे सुलतानपूरला कामाला लागले. तिथेच त्यांचा सुलेखा नामक स्त्री सोबत विवाह झाला. त्यांच्या पहिल्या पुत्राचे नाव श्रीचंद, तर दुसऱ्या पुत्राचे नाव लक्ष्मीदास असे ठेवले. नानक हे खरे पाहता एक कवी होते. ते 'बहतानिर' या भाषेत काव्य करायचे. ही भाषा उर्दू, पर्शियन, सिंधी, पंजाबी, मुघलानी अशा अनेक भाषांपासून बनली आहे. त्याचा प्रत्यय आपल्याला गुरू ग्रंथ साहिब वाचताना होतो.



कवी असल्यामुळे त्यांच्याकडे संवेदनशीलता होती. त्यातूनच त्यांना ज्ञान प्राप्त झाले. कर्मकांड आणि चुकीच्या धर्मातून लोकांना ज्ञानाचा मार्ग देण्याचे काम नानक यांनी चालू केले होते. अनेक सुफी मुसलमान, हिंदू लोक यांच्यासोबत नानक यांनी युक्तिवाद केला, प्रत्येक युक्तिवादात नानक विजयी ठरत गेले. मर्दाना नामक एक मुस्लीम शिष्य त्यांचा पहिला शिष्य होता. यानंतर अनेक लोक नानक यांना येऊन सामील झाले. शीख धर्माची स्थापना नानकांनी केली होती आता त्याचा प्रचार ते करीत असत. त्यांनी घरादाराचा त्याग केला, अनेक ठिकाणी ते फिरले आणि तीर्थाटन केले. त्यावेळेस त्यांनी कर्मकांडांवर घणाघात आघात केला, विरोध केला, त्यांचे मत होते की, देव हा एकच आहे आणि तो सर्वत्र आहे, जाती धर्म या भेदाभेदात पडू नये आणि त्या एक परमात्म्याचे ज्ञान व्हावे म्हणून त्यांनी 'जपूजी साहिब' लिहिले. यात एक ओंकार म्हणत त्यांनी देव एक असल्याचे सांगितले. गुरुग्रंथ साहिबमध्ये हे सर्वात पहिल्यांदा वाचायला मिळते. करतारपूरमध्ये म्हणजेच आजच्या पाकिस्तानातील पंजाब भागात त्यांनी अखेरचा शेवटचा श्वास घेतला. निर्वाणापूर्वी त्यांनी भाई लेहणा नामक स्वतःच्या शिष्याचे नाव अंगद ठेवले. या अंगद गुरूंना त्यांनी आपले वारस म्हणून घोषित केले. ७० वर्षांचे गुरू नानक करतारपूर येथे २२ सप्टेंबर १५३९ ला निर्वाणीस गेले. हिंदू आणि मुसलमान लोकांनी त्यांच्या शरीरावरची चादर अर्धी-अर्धी वाटून घेतली आणि आपापल्या पद्धतीने अंत्यसंस्कार केले. गुरुनानक यांच्या जयंतीस प्रकाश पर्व सुद्धा म्हणतात.

# श्री नामदेव महाराज

**पंढरीचा वास चंद्रभागे स्नान।**
**आणिक दर्शन विठोबाचें ||१||**
**हेचि घडो मज जन्मजन्मांतरी |**
**मागणे श्रीहरी नाही दुजे ||२||**
**मुखी सदा नाम संताचे दर्शन ।**
**जनी जनार्दन ऐसा भाव ||३||**
**नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारी ।**
**कीर्तन गजरी सप्रेमाचे ।।४।।**

नामदेवांच्या बाळलीलांनी सारा आसमंत दुमदुमत होता, नामदेव आता आठ वर्षांचे झाल्यामुळे त्या काळच्या रूढीप्रमाणे दामाशेटीनी त्यांचे लग्न करायचे ठरविले व त्याप्रमाणे ते पुढील तयारीलाही लागले. गोविंदशेट सदावर्ते यांचे योग्य कूळ पाहून त्यांची मुलगी राजाबाई हिला सून म्हणून पसंत केले. नामदेव व राजाबाई यांचा विवाह समारंभ फारच थाटामाटाने पार पडला.



संत महिमा

विलास खानोलकर

आता नामदेवांनाही थोडेफार घरी लक्ष ठेवावे लागत असे. नामदेव पांडुरंगाच्या सेवेत रमून गेले होते. कोणतेही ऐहिक सुख त्यांना आता नको होते. ते आता संपूर्ण पांडुरंगमय झाले होते. पांडुरंगाचे नामस्मरण हीच त्यांची भूक होती व ती ते अहोरात्र विठ्ठलाचे नामसंकीर्तन करून भागवीत होते. हळूहळू पांडुरंगसुद्धा नामदेवमय झाले नामदेव अखंड दिवस देवळातच असत.



'अरे नाम्या, आपलं घरदार सोडून इथे तू करणार काय? खाणार काय? तुझ्या शरीराची, तुझ्या तहान-भुकेची काळजी कोण घेणार?' दामाशेटीनी जरा कलाने घेत विचारले. 'माझे सावळे परब्रह्म, सगळे काही नीट सांभाळीत आहे. या प्रभूच्या पायाजवळ मला कसलीही कमतरता नाही. काहीही झालं तरी आता पंढरपूर हेच माझं गाव आणि हे पांडुरंगाचे देऊळ हेच माझं घर. वाटलं तर तुम्हीच तिकडचं सगळं घेऊन इथे पंढरपुरात येऊन राहा.' नामदेवांच्या या निश्चयापुढे दामाशेटीना हार खावी लागली आणि त्यांनी मनाशी पक्काच निर्णय घेऊन, आपले गाव सोडून पंढरपुरात वस्ती करण्याचे ठरविले. नामदेवाच्या घेत हे नामदेवाचा निरोप घेऊन ते पुढील तरतुदीसाठी घाईघाईने गावाकडे येण्यास निघाले. लवकरच त्यांनी गावाकडचे आपले बिऱ्हाड मोडून सर्व काही होत नव्हतं ते घेऊन, त्यांनी पंढरीची वाट धरली. आजपर्यंत राहात असलेले गाव, घर सोडताना दामाशेटींना भडभडून येत होते. आता आपण या गावाला कायमचे मुकणार म्हणून त्यांच्या मनाची उलघाल चालली होती, पण राजाबाईच्या केविलवाण्या मुद्रेकडे पाहून त्यांना हा निर्णय घ्यावाच लागला होता. आपली एकुलती एक सून; तिचा संसार तर झाला पाहिजे हा एकच विचार त्यांच्यापुढे होता. नामदेवांचा संसार हेच त्यांचे सर्वस्व राहिले होते. त्यामुळे आपले मूळ गाव सोडताना होणारं दुःख त्यांना मनातल्या मनात ठेवावे लागले. त्यांना एकच समाधान होतं की निदान पंढरपूरसारख्या पवित्र क्षेत्री आपण आता कायमचीच वस्ती करणार आहोत. प्रत्यक्ष पांडुरंगाने आपल्या मुलाला आपलासा करून घेतला आहे. एका दृष्टीने ईश्वरकृपेचा वरदहस्त नामदेवावर आहे. आता संपूर्णपणे तोच पांडुरंग आम्हाला तारील अथवा मारील असे बोलून त्यांनी आपले मूळ गाव सोडले.

# पुंडलिकाच्या भेटी परब्रह्म आले गा ...

**युगे अठ्ठावीस विटेवरी उभा !**
**वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा !!**
**पुंडलिकाच्या भेटी परब्रह्म आले गा !**
**चरणी वाहे भिमा उद्धरी जगा !!**



अठ्ठावीस युगांपासून जो विटेवर उभा आहे. ज्याच्या डाव्या बाजूला रखुमाई उभी आहे असा हा विठ्ठल म्हणजेच परब्रह्म श्रीकृष्ण भक्त पुंडलिकाला भेटायला पंढरपुरात आले आहेत.

त्यांच्या चरणाशी वाहणारी भिमा नदी जगाचा उद्धार करणारी आहे, तर श्रीकृष्ण पुंडलिकाला भेटायला का आले याची पौराणिक कथा स्कंद पुराणात दिली आहे. एक दिवस श्रीकृष्णांना वृंदावनातला आपला बाल्य काळ आठवतो आणि त्यांना गोप-गोपिकांसमवेत राधेची सुद्धा आठवण येते आणि ते तिला बघण्यासाठी भेटीचे पाचारण करतात. श्रीकृष्णांनी बोलावल्यावर राधा त्यांना भेटायला द्वारकेत प्रगट होते. श्रीकृष्ण आणि राधा बोलत असताना तिथे रुक्मिणी येते.

रुक्मिणीला बघून सुद्धा राधा उठत नाही हे पाहून रुक्मिणीला राग येतो आणि ती रुसून तिथून निघून दिंडीरवनात येते आणि ध्यान करायला बसते. श्रीकृष्ण तिला सगळीकडे शोधून मग दिंडीरवनात येतात. तिथे येऊन ते रुक्मिणीची समजूत घालतात. रुक्मिणीचा रुसवा जातो मग श्रीकृष्णांना तिथेच जवळ राहणाऱ्या आपला भक्त पुंडलिकाची आठवण येते आणि ते त्याला भेटण्यासाठी त्याच्या घरी जातात. पुंडलिक हा एक विष्णू भक्त होता. तो त्याची पत्नी, आई-वडील, सत्यवती आणि जानुदेव यांच्यासह दिंडीरवनात राहत होता. पुंडलिक एक सद्‌गुणी मुलगा होता. लग्न झाल्यावर त्याचा स्वभाव बदलतो. तो आपल्या आई-वडिलांना खूप त्रास देत असतो. त्याच्या त्रासाला कंटाळून त्याचे आई-वडील काशीला जाण्यासाठी निघतात. पुंडलिकाच्या पत्नीला हे कळताच तीही त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेते. ती आणि पुंडलिक घोड्यावर बसून यात्रेकरूंच्या आई-वडील असलेल्या गटात सामील होतात. पुंडलिक आणि त्याची पत्नी घोड्यावर बसून यात्रा करतात, तर आई-वडील पायी यात्रा करतात. रोज रात्री जेव्हा मुक्कामाला थांबतात तेव्हा पुंडलिक त्याच्या आई-वडिलांना घोडे तयार करण्यास आणि इतर कामे करण्यास सांगत असतो. गरीब आई-वडील तीर्थयात्रेला जाण्याच्या आपल्या या निर्णयावर स्वतःलाच दोष देतात.



मनाचा गाभारा

अर्चना सरोदे

एक दिवस हा गट महान ऋषी कुक्कुट स्वामींच्या आश्रमात पोहोचतो. तिथे ते दोन रात्री घालवण्याचा निर्णय घेतात. सर्वजण थकले असल्याने लवकरच झोपी जातात. पुंडलिकाला मात्र झोप येत नाही. साधारण तिसऱ्या प्रहरी घाणेरडे कपडे घातलेल्या सुंदर, तरुणींचा एक गट आश्रमात प्रवेश करताना, फरशी स्वच्छ करताना, पाणी आणताना आणि स्वामींचे कपडे धुताना त्याला दिसतो. नंतर त्या आश्रमाच्या आतील खोलीत शिरतात आणि स्वच्छ कपडे घालून बाहेर येतात आणि गायब होतात. दुसऱ्या रात्री त्याला पुन्हा तेच दृश्य दिसते. पुंडलिक त्यांच्या पाया पडून त्यांना विनंती करतो की, तुम्ही कोण आहात ते सांगा. तेव्हा त्या सांगतात की आम्ही गंगा, यमुना, सरस्वती आणि भारतातील इतर पवित्र नद्या आहोत. ज्यात यात्रेकरू स्नान करून पापे धुतात. स्नान करणाऱ्या यात्रेकरूंच्या पापांमुळे आमचे कपडे मलिन होतात म्हणून आम्ही इथे येतो. त्या म्हणतात, ''तू सर्वांत मोठा पापी आहेस. कारण तू तुझ्या आई-वडिलांशी खूप वाईट वागला आहेस,'' हे ऐकून पुंडलिकाला आपल्या वागण्याचा पश्चात्ताप होतो आणि तो स्वतःला पूर्ण बदलतो आणि तो आई-वडिलांची सेवा करू लागतो. त्याच्या प्रेमाने आणि आपुलकीने ते सर्वजण तीर्थयात्रा सोडून पुन्हा दिंडीरवनला परत येतात. हे दिंडीरवन म्हणजेच आताचे पंढरपूर आहे, तर या भक्त पुंडलिकाला भेटायला श्रीकृष्ण निघतात.

श्रीकृष्ण आणि रुक्मिणी पुंडलिकाच्या आश्रमात येतात, पण त्यावेळी पुंडलिक त्याच्या आई-वडिलांची काळजी घेण्यात व्यस्त असतो. त्याला माहीत असते की, भगवान श्रीकृष्ण त्याला भेटायला आले आहेत; परंतु तो आई-वडिलांची सेवा करण्याचे सोडून त्यांना भेटण्यास नकार देतो आणि भगवान श्रीकृष्णाला उभे राहण्यासाठी बाहेर एक वीट फेकतो. पुंडलिकाच्या आपल्या आई-वडिलांवर असलेल्या भक्तीने प्रभावित होऊन, भगवान श्रीकृष्ण विटेवर उभे राहून पुंडलिकाची वाट पाहतात. जेव्हा पुंडलिक बाहेर येतो तेव्हा विटेवर उभ्या श्रीकृष्णांना पाहून त्यांची क्षमा मागतो. तेव्हा श्रीकृष्ण त्याला म्हणतात "तुझ्या आई-वडिलांवरच्या भक्तीने मी प्रसन्न झालो आहे. तू तूला हवा तो वर माग". स्कंद पुराणात खूप छान संवाद आहे हा.

**इति स्तुत्वा ततो देवं प्राह गद्‌गदया गिरा ।**
**अनेनैव स्वरूपेण त्वया स्थेयं ममान्तिके ॥**
**ज्ञानविज्ञानहीनानां मूढानां पापिनामपि ।**
**दर्शनान्ते भवेन्मोक्षः प्रार्थयामि पुनः पुनः ॥**

पुंडलिक देवाला विठ्ठलाला गहिवरलेल्या आवाजात म्हणाला, 'आपण याच रूपात माझ्याजवळ राहावे. अज्ञान, अडाणी आणि पापी लोकांनाही केवळ तुमच्या दर्शनाने मुक्ती मिळावी, अशी मी पुन्हा पुन्हा प्रार्थना करतो'. श्रीकृष्ण प्रसन्न होतात आणि त्याची विनंती मान्य करतात. तेव्हापासून भगवान श्रीकृष्ण विठ्ठलाच्या अवतारात आपल्या भक्तांसाठी पंढरपुरात अठ्ठावीस युगांपासून विटेवर उभे आहेत...

**!! जय जय राम कृष्ण हरी !!**

# एक डाव पत्त्यांचा

कधी कधी आपल्याला जीवनाचं गूढ उलगडून दाखवण्यासाठी विद्वत्तेची गरज नसते, तर नजरेत अंतरात्म्याने पाहण्याची धार असावी लागते. कित्येकदा जे खेळ वाटतात, तेच खऱ्या अर्थाने जीवनाचे डाव शिकवणारे गुरू असतात आणि असाच एक खेळ 'पत्त्यांचा डाव'. या डावात लपलेलं असतं आयुष्याचं अद्‌भुत आणि खोल तत्त्वज्ञान. आपला पत्त्यांचा डाव हा रोजच्या जीवनातल्या अनेक निवांत क्षणांचा भाग पण एक अद्वैतदर्शन घेऊन येतो, हे कळल्यावर मन थबकून उभं राहतं. आता अस पाहा ते 'बावन्न पत्ते म्हणजे वर्षातील बावन्न आठवडे असतात नि बदाम, इस्पिक चौकट आणि किलवर म्हणजे चार ऋतू' असं म्हणून जर आपण त्यांच्याकडे पाहिलं तर एक वेगळा दृष्टिकोन त्यातून दिसून येतो. म्हणजेच आपण एका खेळाच्या चौकटीतून जीवनाचं कालचक्र पाहायला लागतो. याचाच अर्थ खेळ इथेच थांबत नाही, तर एक नव्या अर्थाचं गुढतम दार उघडतं. म्हणजे असं पाहा की, प्रत्येक ऋतूची स्वतःची एक गंधित अनुभूती असते. बदाम म्हणजे सृजनाचा वसंत की जेथे प्रेम आणि कोमलता अंकुरते, तर इस्पिक हे अगदी शरदसारखं, 'स्थैर्य, शिस्त आणि विचारांचं वजन घेऊन येतं.'

पण चौकटच पाहाल, तर तो म्हणजे जणू' 'ग्रीष्म म्हणजेच तप्त, तेजस्वी, कारक.' आणि अखेरीस किलवर म्हणजे 'हिवाळा' यात येते ती आंतरमुखता, विश्रांती, आत्मपरीक्षणाचा काळ. हे चार प्रकार म्हणजे केवळ ऋतू नव्हेत, तर ते आहेत आयुष्यातील अवस्थांचे प्रतीक. मनुष्याच्या मनःस्थितीच्या, भावनांच्या आणि कर्मांच्या चक्राचं प्रतिबिंब.



ऋतुराज

ऋतुजा केळकर

आता तेरा पत्ते म्हणजे प्रत्येक ऋतूतील तेरा आठवडे, हा आकडा-जो अनेक संस्कृतींमध्ये गूढतेचा आणि परिवर्तनाचा प्रतीक मानला जातो. तो इथे प्रत्येक ऋतूमध्ये दडलेला आहे.



ऋतू जसे फिरतात, तसेच जीवनाचे भाव-चक्र फिरत राहतात. पत्ते जेव्हा हातात घेतो, तेव्हा आपण नशीब आजमावतो असं आपण म्हणतो. पण खरे तर, त्या प्रत्येक पत्त्यामध्ये आपली स्वतःची एक अवस्था प्रतिबिंबित झालेली असते. आता गुलाम म्हणजे वासनाधिनता म्हणजेच मनाचे अधीन होणं, तर राणी म्हणजे 'मोहमाया' एक भ्रामक आभा. राजा म्हणजे 'अहंकार' ज्यात सत्ता, वरचढपणा आणि सर्वांवर नियंत्रण ठेवण्याची इच्छा दडलेली असते. सर्वात शेवटी पण सर्वात महत्त्वाचा एक्का म्हणजे मनुष्याचा विवेक. हा एक्का जर हातात असला, तर उर्वरित सगळ्या पत्त्यांना दिशा देता येते.



म्हणूनच पत्त्यांचा डाव खेळायचा असेल, तर तो संपूर्ण डाव हा प्रारब्ध वापरताना म्हणजेच खेळताना आपला पुरुषार्थ कसा वापरायचा ते आपले आपण ठरवायचे. या खेळात जे दोन जोकर असतात ते म्हणजे एक नशीब, दुसरा अनपेक्षितता आणि तेच नियोजन आणि अनिश्चिततेचं सुंदर मिश्रण आहे आणि हेच तर जीवनाचं खरे स्वरूप आहे हे विसरू नका.

अखेरीस माझ्याच शब्दांत सांगायचे झाले, तर

'पत्ते मिळतात, पण खेळ आपला असतो...
नियती देते, पण विजय पुरुषार्थाने जिंकतो...
जोकर येतो नशीब बनून, कधी गोंधळ घालतो...
पण खरा विजेता तो, जो अनिश्चिततेतही मार्ग शोधतो...'

# अहंकार व अभिमान



माणूस देवाला विसरला असे म्हणण्यापेक्षा त्याला देव म्हणजे काय हेच कळलेले नाही, हे म्हणणे जास्त योग्य. विसरला असे म्हणायला कधी तरी स्मरण केलेले असावे लागते. २९ चा पाढा विसरला म्हणता येईल. कारण पूर्वी कधी तरी तो पाठ केलेला होता. परमेश्वराच्या बाबतीत असे म्हणता येत नाही. कारण परमेश्वराचे स्मरण माणसाला कधी नव्हतेच आणि नाहीच म्हणून किती वेळा जन्म यावे, किती व्हावे फजित. जन्माला येतो तो देवाच्या विसरात. मरतो तो देवाच्या विसरात. पुन्हा जन्माला येतो ते देवाच्या विसरात, कारण देव म्हणजे काय हेच ठाऊक नसते. त्यामुळे विसर हा शब्द समर्पक नाही. " देवाबद्दलचे अज्ञान''. अज्ञान हा शब्द परफेक्ट आहे. देवाबद्दल थोडे जरी ज्ञान झाले ना तरी आपला अहंकार जातो व अहंकार गेला की तिथे सुखाचा सुकाळ. अहंकार आला की, दुःखाचा सुकाळ. आपल्या जीवनात ताप का? ताप एवढ्यासाठीच आहे. कारण आपण मी करतो, मी आहे म्हणून सर्व आहे असे म्हणतो. मी असा, मी तसा यातून तो देवापासून दूर दूर जातो. मी देह आहे असे म्हणणे ठीक आहे. तिथे पापाला सुरुवात नाही. कारण मी देह आहे ही वस्तुस्थिती आहे. मी देह आहे. इथून पुढे मी असा, मी अमूक इथे जातो तेव्हा अहंकाराला सुरुवात होते. मी असा हा अहंकार व मी अमूक हा अभिमान. हे दोन्ही एकच, थोडाफार फरक आहे पण अहंकार व अभिमान यातून माणसाच्या दुःखाला सुरुवात होते. आज दुःख का? हेच लोकांना कळत नाही. आज लोक जे काही करतात ते वरवरच्या फांद्या तोडण्यासारखे आहे. आपण मुळाकडे जातच नाही. आज जगात टंचाई आहे. ही टंचाई का आहे? यात मानवनिर्मित टंचाई किती व निसर्गनिर्मित टंचाई किती हे पाहिले, तर निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो. "एका बीजापोटी तरुवर कोटी'' पण माणूस टंचाई निर्माण करतो. माणूस ही टंचाई का निर्माण करतो? पैशासाठी. आज माणसे पैशांच्या पाठीमागे धावत आहेत. पैसे वाईट नाही. पैसा चांगल्या मार्गाने मिळविला पाहिजे, पण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, पैशाला महत्त्व किती द्यायचे? एका ठरावीक मर्यादेपर्यंत पैशाला महत्त्व दिले पाहिजे, पण त्याच्या पलीकडे जातो तेव्हा पैसा तुमच्या दुःखाला कारणीभूत ठरतो. बहुतेक पैसेवाले दुःखी असलेले दिसतील. मला कित्येक श्रीमंत लोक भेटतात व त्यांची दुःखे सांगतात. त्यांची दुःखे वेगळी, गरिबांची दुःखे वेगळी, मध्यमवर्गीयांची दुःखे वेगळी. सर्वांची दुःखे वेगवेगळी असतील, पण सर्वांचे कारण एकच परमेश्वराचा विसर, परमेश्वराबद्दलचे अज्ञान हे होय.



जीवन संगीत

सद्‌गुरू वामनराव पै

# करडचे कारनामे बांगरने केले उघड

**खळबळजनक दावे: मयत मुंडेची पत्नी आक्रमक; आरोपींची पाठराखण का केली जात आहे**

पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:विजयसिंह उर्फ बाळा बांगर याने पत्रकार परिषद घेऊन वाल्मिक कराड चे कारनामे उघड करत खळबळजनक खुलासे केले आहेत. विशेषत २०२३ मध्ये परळीत घडलेल्या महादेव मुंडे खून प्रकरणाची आपबीती समोर आणली आहे. महादेव मुंडेला संपवून त्याचे मांस, हाड,रक्त वाल्मिक कराड समोर आणून मारेकऱ्यांनी ठेवले असा खळबळजनक खुलासा बाळा बांगर यांनी पत्रकार परिषदेत केला आहे. या वरुन मयत महादेव मुंडे ची पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे आक्रमक झाल्या असून बाळा बांगर यांच्या जबाब नोंदवून पोलीस प्रशासनाने आरोपी अटक करावेत अशी माध्यमांसमोर मागणी केली आहे. आम्हाला न्याय द्यावा अन्यथा बीड पोलीस अधिक्षक कार्यालया समोर आत्मदहन करणार असा इशारा देखील या वेळी त्यांनी दिला आहे. त्या पुढे बोलतांना म्हणाल्या कि , घटनेला १८ महिने उलटले आहेत. पोलीस प्रशासन मात्र अद्याप आरोपींना अटक करु शकले नाही , पोलीस प्रशासनावर कुणाचा दबाव आहे का ? हे पोलीस प्रशासनाने सांगावे नाही तर केस फाईल बंद करुन टाकावी असेही संतप्त होऊन ज्ञानेश्वरी मुंडे म्हणाल्या आहेत. त्या पुढे बोलतांना म्हणाल्या आहेत कि , बांगर यांचा जबाब घेऊन आरोपींना अटक करण्यात यावी कारण त्यांना आरोपी माहीत आहेत आणि त्यांची फिर्याद देखील घ्यावी, त्याच बरोबर पोलीस प्रशासनास देखील आरोपी निष्पन्न झाले आहेत,पण ते आरोपीची पाठराखण का करत आहेत? तत्कालीन पोलीस निरीक्षक सानप यांचे देखील चौकशी करावी.या प्रकरणाची चौकशी केज येथील पोलीस अधिकाऱ्याकडे देण्यात आलीय. मात्र, ते भेटायला देखील आले नाहीत. याबाबतीत आंदोलन उपोषण केले. मात्र, अद्याप आम्हाला न्याय नाही. काल बांगर यांनी आरोपीचे नाव घेऊन टेबलवर मांस ठेवल्याचे सांगितले.तरी देखील एसपी आणखी शांत का आहेत? पोलिसांवर कोणाचा दबाव आहे हे तपासले पाहिजे. सानप यांचे सीडीआर काढले पाहिजेत. एसपी सरांनी यात कुणाचा दबाव आहे का ते सांगावे. नाहीतर केस बंद करून टाकावी. या प्रकरणात प्रशासन दुर्लक्ष करत आहे हे दिसून येतय. आरोपीची पाठराखण का केली जात आहे ,हे तपासले पाहिजे असेही मुंडे म्हणाल्या आहेत. दरम्यान परळीतील महादेव मुंडे खून प्रकरणाला १८ महिने उलटूनही अद्याप पूर्णपणे तपास लागलेला नाही. आता मुंडेंच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून आत्मदहन करण्याचा ईशारा दिला आहे. दरम्यान परळी शहरातील निवासस्थानी प्रसार माध्यमांशी त्यांनी गुरुवार दि.३ जुलै रोजी संवाद साधला.



## "काय म्हणाले होते बांगर

वाल्मीक कराडचे जुने सहकारी विजयसिंह (बाळा) बांगर खळबळजनक खुलासे करतांना माध्यमांशी बोलतांना म्हणाले कि , महादेव मुंडे यांना मारल्यानंतर मारेकऱ्यांनी वाल्मीक कराडच्या टेबलावर त्यांचं कातडं, हाड आणि रक्त आणून ठेवलं होतं. यानंतर वाल्मीक कराडने मारेकऱ्यांना शाबासकी दिली आणि गाड्याही गिफ्ट दिल्या, असा गौप्यस्फोट विजयसिंह बांगर यांनी केला आहे. त्यामुळे महादेव मुंडे खून प्रकरणात खळबळजनक दावा केल्यानंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बाळा बांगर यांचा जबाब पोलिसांनी नोंदवून घ्यावा अशी मागणी देखील केली आहे."

# भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे.



एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे-येणेसाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र पण दोन...

# शाहू महाराजांनी कल्याणकारी निर्णय घेतले

**अवचार हिम्मतराव:औष्णिक विद्युत केंद्रात जयंती**



पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:छत्रपती शाहू महाराज यांनी कल्याणकारी निर्णय कोल्हापूर संस्थानात घेतले असे प्रतिपादन परळी औष्णिक विद्युत केंद्राचे उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांनी प्रशासकीय कार्यक्रमात केले. कार्यक्रमाच्या सुरवातीला छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून वंदन केले. तसेच थर्मल कॉलोनीतील दवाखान्यामध्ये जयंतीनिमित्त रक्तदान शिबिरात १८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी अधीक्षक अभियंता राजीव रेड्डी, सहाय्यक कल्याण अधिकारी शरद राठोड, परळी संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आर एस जाधव, महेंद्र रोडे, नितीन ढाकणे, कामगार नेते बी एल वडमारे, भीमराव सिरसाट, वैद्यकीय अधीक्षक डॉ ज्योती रांदड, डॉ प्रीतम कांबळे, वरिष्ठ व्यवस्थापक बी आर आंबड, वित्त व लेखा विभागाचे वरिष्ठ व्यवस्थापक अरविंद येरणे, व्यवस्थापक एस बी डोंगरे, पंकज ऐवाळे, नंदकुमार आंधळे, कार्यकारी अभियंता कुंदन राठोड, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे, महादेव वंजारे, संचालक ए जी रोडे, संघरक्षित मस्के, जयवर्दन सूर्यवंशी, विपीन कांबळे, भगवान साकसमुद्रे, राजू गाजले उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन के एच गित्ते मॅडम यांनी मानले.

# गोमांस विक्रीवर कार्यवाही



पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:गोमांस विक्रीवर सिरसाळा पोलीसांनी कार्यवाही करत ५० किलो गोमांस हस्तगत केले आहे . हि कार्यवाही सिरसाळ्यात आठवडी बाजार दिवशी काल दिनांक ३ रोजी गुरुवारी करण्यात आली , या विषयी सविस्तर वृत्त असे कि ,काल रोजी सकाळी ७.५५ वाजणेच्या सुमारास मदीनानगर भागात अलीम रईस कुरेशी वय ३० वर्षे रा. मदीनानगर, सिरसाळा ता. परळी जि. बीड याचे ताब्यात मदिना नगर, सिरसाळा येथे घरामध्ये विना परवाना बेकायदेशिरित्या गोवंश मांस आढळून आले , प्राण्याची कत्तल करुन सदर जनावराचे मुंडके, शिंगे, कातडीची विल्हेवाट लावुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करुन गोवंश सदृश्य प्राण्याचे मांसासह मिळून आला म्हणून इसम नामे अलीम रईस कुरेशी वय ३० वर्षे रा. मदीनानगर, सिरसाळा ता. परळी जि. बीड याचे विरुध्द कलम २३८ बीएनएस सह कलम-५,५ (क), ९ (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमचे अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बीडमध्ये सीट्रिपलआयटीचा निर्णय

**डॉ.योगेश क्षीरसागर:औद्योगिक वातावरण विकसित होईल**





पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड: उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या पुढाकारामुळे या महत्त्वाकांक्षी इ्सीट्रिपलआयटीफ (सेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲण्ड ट्रेनिंग) या प्रकल्पाच्या उभारणीस गती मिळाली आहे. प्रकल्पासाठी ४ हजार चौ.मी. जागा मंजूर केली असून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला आहे. अजितदादांमुळे जिल्ह्यात औद्योगिक वातावरण विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.बीडमध्ये सीट्रिपलआयटी प्रकल्पासाठी ४,००० चौ. मी. जागा मंजूर करण्यात आली आहे. एमआयडीसीकडून जागा देण्यासाठी आणि प्रक्रिया पूर्ण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा १९१ कोटींचा प्रकल्प असून, टाटा टेक्नॉलॉजीकडून पुढाकार घेण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे दरवर्षी सुमारे ७,००० युवकांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. जिल्हा प्रशासन या प्रकल्पासाठी ३३ कोटींचा खर्च उचलणार असून, प्रशिक्षणाचा खर्च पहिल्या तीन वर्षांसाठी टाटा टेक्नॉलॉजीकडून केला जाणार आहे. या प्रकल्पामुळे उद्योग आणि रोजगाराच्या संधीमध्ये बीड जिल्ह्यात नवा अध्याय सुरू होणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील तरुणांना रोजगार, कौशल्यविकास आणि नवीन तंत्रज्ञान प्रशिक्षणाची संधी मिळणार असून जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीला बळ मिळणार आहे, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त करत अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. तसेच, जिल्ह्यातील युवकांना कौशल्य प्रशिक्षणाच्या पण दोन...

# ...अखेर लालपरी धावू लागली

**दिलासा:सोमठाना-सरवर पिंपळगावची गैरसोय टळली**



गंगामसला:माजलगाव तालुक्यातील सोमठाना, सरवर पिंपळगाव, आडोळा गावातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी एसटी बस सेवा नसल्याने मोठी कसरत करावी लागतसुरु होती तीन चार किमी अंतर पायी चालत जावे लागत होते. ही विद्यार्थ्यांची गैरसोय बघुन फिरोज खान पठाण व ग्रामस्थयांच्याकडे धाव घेत बस सेवेची मागणी केली होती. सोळंके यांनी माजलगाव आगरप्रमुखांना सदर गावांसाठी सोमठाना ते माजलगाव एसटी बस सेवा सुरु करण्याची सूचना केली लगेच बस सेवा सुरु झाली.बस सुरू झाल्याने परिसरातील विद्यार्थ्यांना व वयोवृद्ध नागरिकांना दिलासा मिळाला अडचण दूर झाली आहे. बर्याच वर्षांनी गावात बस आल्याने ग्रामस्थांनी आगारप्रमुख सुहास कोळपकर यांचा सत्कार करून चालक- वाहक एसटी बसचे स्वागत केले.जयसिंग भैय्या सोळंके व फिरोज खान पठाण यांचे ग्रामस्थांनी मनापासून आभार मानले. दरम्यान प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

# लोकमान्य हॉस्पिटल्सची योजना

**दिलासा : रोबोटिकच्या साहाय्याने होणार शस्त्रक्रिया**



पुण्यभूमी प्रतिनिधी
पुणे:रोबोटिक प्रणालीच्या साहाय्याने सांधेरोपण शस्त्रक्रियेमध्ये आशियातील अग्रगण्य रूग्णालय असलेल्या व ५० हुन अधिक वर्षांचा वारसा असलेल्या लोकमान्य हॉस्पिटल्सने उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपी ने केलेल्या गुंतवणूकीसह धोरणात्मक विस्ताराची घोषणा केली. उनाप्राईम इनव्हेस्टमेंट डव्हायझर्स ने स्थापित केलेल्या स्पेशल पर्पझ व्हेईकल (एपीव्ही) च्या माध्यमातून महाराष्ट्र स्थित व रूग्णालयांची साखळी असलेल्या लोकमान्य हॉस्पिटल्समध्ये सुमारे ८४.५ टक्के हिस्सा संपादित केला आहे. यामुळे महाराष्ट्रातील सर्वात आधुनिक मल्टीस्पेशालिटी व क्वार्टनरी केअर रुग्णालय साखळ्यांपैकी पैकी एक अशी ओळख निर्माण होईल.या व्यवहारात टाटा हेल्थ केअर फंडकडे असलेल्या पूर्वीच्या हिस्सेदारीचे उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपी तर्फे संपादन आणि संस्थेच्या महत्त्वाकांक्षी विस्तार योजनांना बळ देण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्राथमिक भांडवल उभारणीचा समावेश आहे. उनाप्राईम हेल्थकेअर एलएलपीला प्रख्यात देशांतर्गत संस्थांचे पाठबळ असून यामध्ये भारतात बहुअवयव प्रत्यारोपण आणण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेले ग्लोबल हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.के.रविंद्रनाथ आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ञ श्री.मनप्रीत सोहल यांचा समावेश आहे. लोकमान्य हॉस्पिटल्सचे समूह मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक मनप्रीत सोहल पण दोन...

# कडा येथे जगन्नाथ रथयात्रा

**अध्यात्मिक: भाविक-भक्तांचा लोटला**



पपुण्यभूमी प्रतिनिधी
कडा: आंतरराष्ट्रीय श्रीकृष्ण भावनामृत संघ इस्कॉन कडा शाखेच्या वतीने गुरुवारी कडा शहरात जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. भगवान जगन्नाथ यांची रथयात्रा जगन्नाथ पुरीमध्ये ज्याप्रमाणे साजरी केली जाते. त्याचप्रमाणे कडा येथे या रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. इस्कॉन परिवारातील अनेक भक्त , बाळ गोपाळ, महिला भाविक महामंत्राचा जयघोष करत रथयात्रेत सामील झाले होते. ही रथयात्रा जुने बसस्टॅन्ड येथून सुरू झाली. धामणगाव रस्त्याने जात इस्कॉन मंदिरात यात्रेचा समारोप झाला. अहिल्यानगर इस्कॉनचे अध्यक्ष गिरीवरधारी प्रभुजी व सुरज थोरात प्रभुजी यावेळी उपस्थित होते. मुकुंद संजय दास यांनी सर्वांचे स्वागत केले. देवी निमगाव येथील भगवान पाचे , बाजीराव रांगोळे , भगवान पोपळे , कडा येथील शिवाजी पाचे, दत्ता सरोदे , सोमनाथ आगलावे , महेश जाधव , अमोल सांगळे , अंकुश शिंदे , जाधव , पवार यांच्यासह अनेकांनी रथयात्रा यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले . आदितीसुत प्रभूजी यांनी आभार मानले.



# अनाधिकृत इंग्लिश स्कूलचा विळखा

**मनोज जाधव : बीडमध्ये अनाधिकृत शाळांवर कारवाई होणार का?**

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:राज्यातील अनाधिकृत शाळांबाबतची माहिती सादर करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने आदेश निर्गमित केले असून आता जिल्ह्यात अनाधिकृत शाळा आढळुन आल्यास सदरिल शाळेवर शासन निर्णय दि.१८ डिसेंबर २०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे. अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचेकडुन त्यांचे बीट/केंद्र मधील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जियो टॅग फोटो काढणे आणि विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ ०७ जुलै पर्यंत सदरिल माहिती व अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल आणि इतर शाळा जास्त आहेत. तेव्हा शिक्षण विभागाला अनाधिकृत शाळा सापडणार का? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का ? असा सवाल शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केला आहे.राज्यात मागील काही वर्षांमध्ये राज्य शासनाची कोणतीही मान्यता न घेता अनाधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसूल करत असतात. या शाळांवर कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालनालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात तपासण्या करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यात देखील बऱ्याच अनाधिकृत शाळा असल्याची भीती व्यक्त होत आहे. परंतु जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई केली जाईल का ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी करण्याचे कागदी घोडे न नाचवता संबंधित शाळांवर कारवाईच करावी. अशीही मागणी मनोज जाधव यांनी केली आहे. दरम्यान नाधिकृत शाळांवर कारवाईची मागणी बीड जिल्ह्यात नाधिकृतपणे सुरू असलेल्या शाळांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलावी, अशी मागणी पालक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

# गेवराई तालुक्यात कलेक्टरांचा दौरा

**शेतकरी,नागरिक,विद्यार्थ्यांच्या समस्या घेतल्या जाणून**



पुण्यभूमी प्रतिनिधी
गेवराई:जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दि. २ जून रोजी गेवराई तालुक्यातील रूई, सिरसदेवी, नवोदय विद्यालय गढी , गेवराई येथे भेटी दिल्या. रूई येथे रेशीम शेती, उत्पादन, यांस भेटी देऊन रेशीम क्लस्टर डेव्हलपमेंट योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय येथे भेटी देऊन ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. सिरसदेवी येथे भेटी देऊन जलजीवन मिशन ग्रामीण पाणीपुरवठा योजना पाहणी केली, सिरसदेवी येथील मुख्यमंत्री सोलर योजना २.० अंतर्गत काम सुरू असलेल्या ४ मेगावॉट वीजनिर्मिती प्रकल्प केंद्राच्या कामाची पाहणी केली. जवाहर नवोदय विद्यालय गढी येथे भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, त्यांच्याशी संवाद साधला, अडचणी समजावून घेऊन नवोदय विद्यालयातील विद्यार्थी वसतिगृह, भोजन व्यवस्था तपासणी केली. गेवराई येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांच्याशी संवाद साधला अडचणी समजावून घेऊन सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. डीपीडीसीतून फंड उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले. सदर विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. शहरातील तहसील कार्यालयात पण दोन...